सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जिथं वक्फचा वाद उफाळला, तिथे भाजपाला मिळाला 'ऐतिहासिक' विजय

### केरळमध्ये हैराण करणारा निकाल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ तिरुअनंतपुरम**

केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालानं केवळ जागांचे गणित बदलले नाही तर राज्यातील राजकारणात अनेक असे मुद्दे केंद्रस्थानी आणलेत ज्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीची दिशा ठरू शकते. लेफ्ट डेमोक्रेटिक फ्रंटने परंपरागत दबदबा कायम ठेवला. काँग्रेसनेही अनेक भागात मजबुतीने लढत दिली परंतु भाजपासाठी या निवडणुका महत्त्वाच्या मानल्या जात होत्या.

यामागचं सर्वात मोठं कारण म्हणजे एर्नाकुलम जिल्ह्यातील मुनंबम परिसर, ज्याठिकाणी एनडीएचा ऐतिहासिक विजय भाजपाच्या राजकारणाला कलाटणी देणारा ठरला आहे. भाजपाचे केरळ महासचिव अनूप एंटनी जोसेफ यांनी मुनंबम वार्डातील एनडीएचा विजय ऐतिहासिक असल्याचं सांगितले. मुनंबममध्ये जवळपास ५०० ईसाई कुटुंबांवर वक्फ बोर्डाच्या कथित दाव्यानंतर त्यांच्या घरावर संकट उभं राहिले होते असा दावा भाजपाने केला. मोदी सरकार आणि भाजपाने या मुद्द्यावर उघडपणे या लोकांना साथ दिली. त्याचा परिणाम स्थानिक निवडणुकीत लोकांनी भाजपाला पाठिंबा दिला असं एंटनी यांनी म्हटलं आहे.

**७ दशकांचा जुना वाद**

मुनंबम वक्फ वाद जवळपास ७ दशके जुना आहे. १९५० मध्ये सिद्दीकी सैत नावाच्या व्यक्तीने ही जमीन फरीद कॉलेजला दान केली होती. त्यानंतर या जमिनीचा काही भाग कॉलेज प्रशासनाने स्थानिक रहिवाशांना विकला. हे लोक आधीपासून तिथे राहत होते. २०१९ मध्ये केरळ वक्फ बोर्डाने ही संपूर्ण जमीन वक्फची संपत्ती असल्याचे सांगत नोंद केली. ज्यामुळे याठिकाणी झालेला सौदा अमान्य ठरवण्यात आला. त्यानंतर इथल्या शेकडो कुटुंबावर मोठं संकट उभे राहिले होते. या निर्णयाविरोधात मुनंबम आणि चेराई परिसरात ४१० दिवसाहून अधिक काळ आंदोलन चालले होते. प्रभावित लोकांनी कोझिकोड वक्फ ट्रिब्यूनलमध्ये या निर्णयाला आव्हान दिले तर राज्य सरकारने जमिनीची मालकी तपासण्यासाठी सीएन रामचंद्रन नायर आयोग गठीत केला.

२०२५ मध्ये केरळ हायकोर्टाच्या एकल खंडपीठाने हा आयोग रद्द केला होता. परंतु नंतर खंडपीठाने पुन्हा आयोगाला मान्यता देत २०१९ ची वक्फ नोंदणी कायद्यानुसार नाही असे घोषित केले. १२ डिसेंबरला सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिली. जानेवारी २०२६ पर्यंत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले. सध्या या कुटुंबांवर टांगती तलवार आहे. मुख्यमंत्री पिनरा विजयन यांनीही कुणालाही जबरदस्तीने हटवले जाणार नाही असा विश्वास त्या लोकांना दिला आहे. भाजपाने या संपूर्ण वादाला न्याय विरुद्ध अन्याय असं चित्र दिले. मुनंबममधील विजय केरळमधील ईसाई समाजात वाढणाऱ्या विश्वासाचे संकेत मानले जात आहेत. भलेही हा विजय प्रतिकात्मक असेल परंतु वक्फ सारख्या संवेदनशील मुद्द्यांवर भाजपाची आक्रमक रणनीती येणाऱ्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत आणखी तीव्र होताना दिसणार आहे.

## विधान परिषदेतील गुणवत्तापूर्ण चर्चांचे दस्तऐवजीकरण म्हणजे लोकशाहीची खरी ताकद : मुख्यमंत्री फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

भारतातील संसदीय लोकशाहीच्या वाटचालीत महाराष्ट्र विधानपरिषदेचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून या ऐतिहासिक सभागृहाच्या शंभर वर्षांच्या कार्यकाळातील महत्त्वपूर्ण कायदे, ठराव व धोरणांचा दस्तऐवज म्हणून संदर्भसमृद्ध द्वितीय ग्रंथाचे प्रकाशन विधानपरिषद सभागृहात करण्यात आले. वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या विधानपरिषदेने संमत केलेली महत्त्वपूर्ण विधेयके, ठराव आणि धोरणे या ग्रंथाचे प्रकाशन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभ हस्ते झाले. यावेळी अनेक मान्यवर सदस्य उपस्थित होते.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतक महोत्सवानिमित्त प्रकाशित झालेला हा द्वितीय ग्रंथ लोकशाहीच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्प्यांचे दस्तऐवजीकरण करणारा ठरणार आहे. भविष्यातील लोकप्रतिनिधी, अभ्यासक आणि



विद्यार्थ्यांसाठी हा ग्रंथ प्रेरणादायी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधान परिषद सभागृहाचे सदस्य होते. या सभागृहाने अतिशय हुशार, अनुभवी सदस्य दिले आहेत. त्यांच्या हुशारी, अनुभवाचा लाभ कायदा निर्मिती प्रक्रियेत झाला आहे. या सभागृहाने पारित केलेले कायदे, ध्येयधोरणे यावर आधारित ग्रंथसंपदा निर्माण होत आहे. आपल्या सभागृहातील कामकाजाचे 'रेकॉर्ड' होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रेकॉर्ड नसल्याने अनेक ऐतिहासिक संदर्भांना आपण मुकलो आहोत. पश्चिमात्य देशांमध्ये 'रेकॉर्ड' असल्यामुळे त्यांचे संदर्भ आपणास घ्यावे लागतात. आपली लोकशाही पद्धत त्यांच्यापेक्षा दोन हजार वर्षांनी जुनी आहे, मात्र रेकॉर्ड नसल्याने संदर्भ उपलब्ध होत नाहीत. इतिहास हा संकलित करावयाचा असतो. त्यामुळे सभागृहातील भाषणे, निर्मित कायदे यांचे संकलन करून प्रकाशित केलेला ग्रंथ हा नेहमी ऐतिहासिक दस्ताऐवज ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

## 'शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकतेसह समतोल राखण्याचा सरकारचा प्रयत्न'; अजित पवार यांची विधानसभेत माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत यासारख्या स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. या अधिछात्रवृत्तीधारक शिष्यवृत्ती योजनांचा लाभ अधिकाधिक गरजू व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा महायुती सरकारचा उद्देश आहे. यासाठी योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता, योग्य निकषांसह विहित मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात येणार आहेत अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

दरम्यान समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल-वंचित घटकांतील, परदेशात शिक्षण घेण्याची क्षमता नसलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्राधान्याने मदत करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचेही



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. बार्टीच्या शिष्यवृत्तीबाबत विधानसभा सदस्य डॉ. नितीन राऊत यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, राज्यसरकारच्यावतीने टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत यासारख्या स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ काही ठिकाणी एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना मिळत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने माहिती संकलनाची प्रक्रिया सुरू असून, सध्या या शिष्यवृत्तीसाठी या संस्थांचा निम्म्यापेक्षा अधिक निधी खर्च होत आहे. त्यामुळे इतर गरजू विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांसाठी निधी उपलब्धतेवर परिणाम होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत असे सांगितले.

मी कुठल्याही घटकावर अन्याय होऊ देत नाही. माझ्या कामाची कल्पना सर्वांना आहे. समाजातील वंचित वर्गातील ज्यांच्या आई-वडिलांची परिस्थिती नाही पण ते मेरीटमध्ये आहेत अशा विद्यार्थ्यांना मदत करायला महायुती सरकार प्राधान्य देते. त्यांना मदत करते आणि पुढेही करत राहिल. वरील संस्थांना लवकरात लवकर निधी ३० मार्चपर्यंत कसा वितरीत करता येईल असा प्रयत्न आहेच शिवाय बाकीचा निधीही रेग्युलर बजेटमध्ये करुन देतो असे आश्वासनही अजितदादा पवार यांनी दिले.

## शिंदे सेना नाही, शिवसेना, शंभूराज देसाई ठाकरेंच्या आमदारावर संतापले




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

राज्य सरकारचं नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात राज्यातील विविध मुद्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. या पार्श्वभूमीवरच आज विधानसभेत लक्षवेधी सुरू असताना शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई हे शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार वरुण सरदेसाई यांच्यावर चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. 'शिंदे सेना नाही तर शिवसेना म्हणायचं', असं म्हणत शंभूराज देसाई यांनी वरुण सरदेसाई यांना चांगलंच सुनावलं. तसेच वरुण सरदेसाई यांनी देखील शंभूराज देसाई यांच्यावर जोरदार टोलेबाजी केली.

अनावधानाने लोकप्रतिनिधीचं नाव ते विसरून गेले. पण भाजपाच्या दोन पदाधिकाऱ्यांचं नाव त्यांच्या लक्षात होतं. शिंदे सेनेच्या वेळी देखील एका पदाधिकाऱ्याचं नाव त्यांच्या लक्षात होतं. अजित पवार यांच्या पक्षाच्या आमदाराच्यावेळीही त्यांच्या लक्षात होतं, असं सभागृहात वरुण सरदेसाई बोलत होते. मात्र, यावेळी बोलताना वरुण सरदेसाई यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा शिंदे सेना असा उल्लेख केला. पण त्यावर शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांनी तीव्र आक्षेप घेतला.वरुण सरदेसाई हे एकदा नाही तर दोनदा शिंदे सेना म्हणाले आहेत. पण केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेला निर्णय हा त्यांनी थोडा तपासून पाहावा. निवडणूक आयोगाने घटनेप्रमाणे आणि कायदे तपासून शिवसेना, धनुष्यबाण हे आम्हाला दिलेलं आहे. त्यामुळे आमच्या पक्षाचं नाव शिवसेना आहे, आमच्या पक्षाच्या नावाच्या खाली उबाठा वैगेरे जोडलेलं नाही. त्यामुळे त्यांनी आमच्या पक्षाचा उल्लेख करताना शिवसेना असाच करावा. तसेच वरुण सरदेसाई यांनी सभागृहात शिंदे सेना असा उल्लेख केला आहे, तो उल्लेख कामकाजामधून काढून टाकण्यात यावा, असं मंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटलं आहे.


## मुंबईत भाजपचा नव्हे तर महायुतीचाच महापौर होणार ! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मुंबई**

निवडणूकीत जास्तीत जास्त संधी मिळावी असे कार्यकर्त्यांना वाटत असते. परंतु महायुती एकत्रित लढत आहे म्हणून आमच्या कार्यकर्त्यांत फार नाराजी आहे असे कुठलेही चित्र नाही. आमच्यासाठी मुंबई महानगरपालिकेवर महायुतीचा झेंडा फडकविणे हे जास्त महत्त्वाचे आहे. विकासान्मुख व पारदर्शी शासन आणण्यासाठीच आम्ही महायुतीचा निर्णय घेतला आहे. मुंबईत भाजपचा नव्हे तर महायुतीचाच महापौर होणार असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. शनिवारी नागपुरात ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

आगामी महानगरपालिका निवडणूकांसाठी महायुतीच्या फॉर्म्युल्याबाबत विविध दावे करण्यात येत आहेत. मात्र केवळ जिंकणे हाच आमचा फॉर्म्युला राहणार आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत ५५ जागांची भाजपने मागणी केलेली नाही. तेथे केवळ शिवसेना व भाजप हेच प्रमुख पक्ष आहेत. मागील वेळी भाजपच्या ४२ जागा आल्या होत्या. आम्ही आपापसात बसून जागावाटप करू, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

एकाच घरातील पाच जण पीएचडी करत शासकीय



योजनांचा लाभ घेत असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी वक्तव्य केले होते. शासनाने ही योजना हुशार मुलांसाठी सुरू केली आहे. एका घरातील पाच लोक योजनेचा लाभ घेतील तर इतर घरांतील गरजू व होतकरू तरुणांना त्याचा लाभ मिळणार नाही. अजित पवार यांचे बोलणे रास्त आहे, असे फडणवीस म्हणाले.

**मुख्यमंत्र्यांना प्रतिक्रिया देण्याचेच कामधंदे राहिलेत का?**

संजय राऊत यांनी शासनावर केलेल्या टीकेबाबत मुख्यमंत्र्यांना विचारणा केली असता त्यांनी मुख्यमंत्र्यांना प्रतिक्रिया देण्याचेच कामधंदे राहिलेत का असा सवाल केला. कोण काय बोलतो त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी मुख्यमंत्री आहे का ? मुख्यमंत्र्याला एवढेच कामधंदे राहिले का ? आमच्या पातळीचे असेल तर आम्ही उत्तरे देऊ, असे त्यांनी स्पष्ट केले.

## वेगळ्या विदर्भावरून महाविकास आघाडीत जुंपली संजय राऊतांचा वार, विजय वडेट्टीवारांचा पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

संजय राऊत कुणाला महत्त्व देत नाही हा त्यांचा विषय, आम्ही कुठे फार त्यांना महत्त्व देतो. संजय राऊत हा त्यांच्या पक्षाचा विषय आहे. आमच्या पक्षाची भूमिका आम्ही पाहू. संजय राऊतांना मी महत्त्व का देऊ असं सांगत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राऊतांवर निशाणा साधला. वेगळ्या विदर्भाच्या मागणीवरून उद्धवसेनेने विरोध केला. त्यावर संजय राऊतांनी भाजपासह काँग्रेसवरही निशाणा साधला. त्याला वडेट्टीवार यांनी प्रत्युत्तर दिले. नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवारांनी राऊतांवर घणाघात केला.



काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, आघाडी असेल तर आमची चर्चा होते. तो निवडणूक लढण्याचा विषय आहे. मात्र एकमेकांना महत्त्व देण्याचा विषय नाही. आमचे वैचारिक मतभेद आहेत. त्यांची भूमिका वेगळी आहे, माझी भूमिका वेगळी आहे. वेगळ्या विदर्भाची भूमिका मी का मांडतोय, याचे कारण आधी सांगितले आहे. विदर्भाला मुख्यमंत्री मिळाला म्हणजे न्याय मिळाला असं नाही. विदर्भाला काय दिले, ७५ हजार कोटींच्या मागणीत विदर्भ कुठे आहे? एकीकडे समतोल विकासाच्या बाता करायच्या आणि विदर्भाला काही द्यायचे नाही. केवळ घोषणा करतात, प्रत्यक्षात काहीच सुरू नाही. आजही विदर्भातील मुलांचे स्थलांतरण सुरू आहे. कामासाठी बाहेर जावे लागते. विदर्भात दरवर्षी ३-४ जिल्ह्यातून लाखभर मजूर आंध्र प्रदेश, तेलंगणात जातो. ११ वर्षाच्या कारकिर्दीत भाजपा सरकारनं काय दिवे लावले? त्यामुळे विदर्भाची काय व्यथा आहे हे संजय राऊतांना माहिती नाही असं त्यांनी म्हटलं.

## यशवंत स्टेडियमवरून तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न, पोलीस प्रशासनाची प्रचंड दमछाक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

विधिमंडळ हिवाळी अधिवेश अंतिम टप्प्यात आले असताना शनिवारी आंदोलनांचे केंद्रबिंदू ठरलेल्या यशवंत स्टेडियमचा परिसर वेगळ्याच ताणाने हादरले. आरक्षणाच्या मागण्यावरून पहिल्या दिवसापासून आंदोल करत असलेल्या कोळी समाजातील एका तरुणाने स्टेडीयमवरून उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. दरम्यान त्याला रोखण्यासाठी पोलिसांची मात्र प्रचंड दमछाक झाली. अर्धनग्न आंदोलन सुरू असताना हा प्रकार घडला. अंतरवस्त्रावरच हा तरुण स्टेडियमवरून धावत सुटला. त्याला पकडण्यात पोलिसांना चांगलाच घाम फुटला.

कोळी समाजाला आदिवासी (अनुसूचित जमाती) आरक्षण मिळावे, तसेच जात प्रमाणपत्र व वैधता प्रक्रियेत होणारा अन्याय दूर करावा, या



मागणीसाठी आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे प्रणित समितीच्या वतीने अर्धनग्न आंदोलन व बेमुदत आमरण उपोषणाची हाक देण्यात आली आहे.१९५० पूर्वीच्या शालेय व महसुली नोंदींमध्ये कोळी असा उल्लेख असल्याने अनुसूचित क्षेत्राबाहेरील महादेव कोळी, मल्हार कोळी व ढोर कोळी समाजाच्या दाव्यांना नकार दिला जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या नोंदी तत्कालीन कायद्यानुसार असून त्यांना वैध पुरावा मानावा, यासाठी शासन निर्णय तातडीने लागू करावा, अशी आंदोलकांची प्रमुख मागणी आहे.स्पष्ट धोरणाअभावी हजारो कुटुंबांचे शिक्षण, नोकरी व आरक्षणाचे हक्क बाधित होत असल्याचे सांगत शासनाने एकसमान निकष लागू करावेत, अशी मागणी आंदोलक कोळी तरुण करत आहेत. त्या अनुषंगाने शनिवारी अर्धनग्न आंदोलन होणार होते. सकाळी आंदोलनाला सुरवात होताच अंतरवस्त्रातील एक तरुण स्टेडियमच्या वरच्या शिड्यांवर पळत सुटला. तो उडी मारणार असल्याचे ओरडत गेल्याने त्याला पकडण्यासाठी पोलिसांची मात्र प्रचंड दमछाक झाली. त्यामुळे संपूर्ण स्टेडियमवर तणावाचे वावातवरण होते.

## चार 'यूट्यूब' पत्रकारांना पाच दिवसांचा कारावास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी यांची बदनामी केल्याप्रकरणात चार 'यूट्यूब' पत्रकारांना धक्का बसला आहे. विशेषाधिकार समितीने त्यांना पाच दिवसांच्या कारावासात पाठविण्याची शिफारस केली आहे.



सत्यलढा या यूट्यूब चॅनलने राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) सदस्य अमोल मिटकरी यांच्याबाबत तथ्यहीन वृत्त प्रसारित केले होते. यामुळे मिटकरी यांची प्रतिमा मलिन झाली होती. संबंधित युट्यूब चॅनलचे पत्रकार गणेश सोनावणे, हर्षदा सोनावणे, अमोल नांदुरकर, अंकुश गावडे व संपादक सतिश देशमुख यांच्याविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची हक्कभंग विशेषाधिकार समितीद्वारे चौकशी झाली.सांचा कारावास

समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांनी सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे की, 'सत्यलढा' यूट्यूब चॅनलवरून अमोल मिटकरी यांच्याबाबत खोटे व दिशाभूल करणारे आरोप करण्यात आले. यामुळे एका लोकप्रतिनिधीची राजकीय प्रतिष्ठा मलीन झाली असून हा विशेषाधिकारांचा भंग ठरतो. या प्रकरणात संपादकाने लेखी माफी मागितल्याने त्याच्यावर कारवाई न करण्याची शिफारस समितीने केली आहे. तर उर्वरित चारही जणांना पाच दिवसांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. जेव्हा विधीमंडळाचे सत्र सुरू असेल त्या कालावधीत त्यांना कारावासात पाठविण्यात यावे अशी शिफारस समितीने केली आहे. जर या सत्रात कारावास झाला नाही तर पुढील विधीमंडळ सत्रात याची पूर्तता करण्यात यावी असेदेखील समितीने अहवालात स्पष्ट केले आहे.

## संपादकीय ......

# काँग्रेसला ‘सोनिया’चे दिन कधी येणार?

*सोनिया गांधी यांचा परदेशातील जन्म आणि त्या अर्थाने त्यांच्यावर जन्माने अ-भारतीय असल्याचा आरोप हे मोठे राजकीय आव्हान त्यांच्या पुढील राजकीय कारकिर्दीला अडचणीचे ठरणार होतेच. त्यातही केवळ महिला असल्याने पुरुषप्रधान राजकीय मानसिकता असलेल्या भारतात या आरोपाचे वेगवेगळे ‘अराजकीय अनैतिक’ प्रकारही सुरूच झाले होते. महिलेच्या चारित्र्याविषयी चर्चा करून तिला नामोहरम करण्याची खेळी या देशात नेहमीच खेळली गेली आहे. सोनिया गांधीही त्यासाठी अपवाद नव्हत्या, स्वभावातील कणखरपणा त्या देशाच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडून शिकल्या असाव्यात. गरज नसलेल्या महिलाप्रधान भावनिकतेची जागा करारी, मुत्सद्दीपणाने घेतली होती.*

*इंदिराजींच्या कार्यकाळात गांधी घराण्यातील ऐतिहासिक संदर्भाच्या छायाचित्रांचे दिल्लीत एक मोठे प्रदर्शन भरले होते, या प्रदर्शनाला इंदिरा गांधी यांनी भेट दिली होती. त्यावेळी इंदिराजींनी तेथील छायाचित्रांची पाहणी करत असताना एका छायाचित्रकाराने इंदिराजींना सुचवले की, एखाद्या छायाचित्राच्या फ्रेमवरील धूळ इंदिराजी आपल्या पदराने स्वच्छ करत आहेत, असे मी आपले छायाचित्र घेण्याची इच्छा त्या फोटोग्राफरने व्यक्त केली, त्यावर इंदिराजींनी त्याला स्पष्टपणे सुनावले, उगाचच स्त्रीप्रधान भावनिकतेचे ओंगळवाणे सादरीकरण करण्याची मला गरज नाही, मी पंतप्रधान आहे, केवळ महिला नाही. हीच शिकवण सोनिया गांधी यांच्यातही रुजली असावी, म्हणूनच राजीव गांधी यांच्या हत्येनंतर त्यांनी दाखवलेला धिरोदात्तपणा जगातील सगळ्याच माध्यमांसाठी कौतुकाचा विषय झाला होता.*

*सोनिया गांधींच्या परदेशी जन्मस्थळामुळे त्यांना भारत देशाचे नेतृत्व करण्यासाठी कोणी सक्षम ‘पुरुष’ एवढ्या मोठ्या लोकसंख्येत सापडला नाही का? असा गैरलागू प्रश्न तत्कालीन विरोधकांनी प्रत्येक निवडणुकीवेळी विचारला होता. यात परदेशातील जन्म हा मुद्दा वरकरणी दिसत असला तरी त्यामागे एका महिलेला देशाच्या नेतृत्वाची संधी मिळण्यामुळे होणारी पुरुषी अडचणच प्रकर्षाने होती. या दांभिकतेला देशप्रेमाचा तकलादू मुलामा चढवण्यात आला होता. मात्र बहुमत सिद्ध झाल्यानंतर स्वतःऐवजी डॉ. मनमोहन सिंग यांचे नाव पंतप्रधानपदासाठी सुचवून सोनिया गांधी यांनी या विरोधातील हवाच काढून टाकली. त्यामुळे हा मुद्दाच निकालात निघाला. राजीव गांधी यांच्या हत्येनंतर त्यांनी भारतीय राजकारणात दाखल होण्यास काहीशी अनिच्छाच दाखवली होती. परंतु पाच वर्षांच्या कालावधीनंतर काँग्रेसची पिछेहाट आणि भारतीय राजकारणातील नव्याने रुजू होणार्या राजकीय संकल्पनांचा विचार करून सक्रिय राजकारणात प्रवेश केला आणि १९९८ मध्ये काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारले. काँग्रेस कमजोर होत असताना त्यांनी १९९९ मध्ये लोकसभा निवडणूक लढवली, दोन जागा जिंकल्या त्यात बेलारी-कर्नाटक आणि अमेठी-उत्तर प्रदेश होता, पण अमेठीचे प्रतिनिधित्व स्वीकारले.सोनिया गांधी यांच्याकडे ज्यावेळी काँग्रसचे नेतृत्व आले तो काळ कसोटीचा होता. कठीण राजकीय परिस्थितीत पक्ष एकत्र ठेवण्याची क्षमता त्यांनी वेळोवेळी दाखवली. धर्मनिरपेक्षतेच्या मुद्दयावर देशभरात प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य वाढत होते. त्याचवेळी प्रादेशिक अस्मितेच्या नावावर अलगतवाद जोपासणारे राजकारणही आकाराला येत होते. राजीव गांधी हयात असताना सोनिया गांधी यांनी सक्रिय राजकारणात तेवढा सहभाग घेतला नाही, मात्र त्यांच्या निधनानंतर काँग्रेसच्या नेतृत्वाची आणि पर्यायाने देशाची जबाबदारीही त्यांच्यावर येऊन पडली होती. सोनिया गांधी यांच्या परदेशी जन्माचा मुद्दा इतका टोकदार होता की या मुद्द्यावरून शरद पवार यांनी काँग्रेसपासून फारकत घेऊन राष्ट्रवादीची स्थापना केली. मात्र ही आपली राजकीय चूक असल्याचे त्यांनी नंतरच्या काळात मान्य केले होते.*

*सोनिया गांधी यांच्या परदेशस्थ जन्माचा मुद्दा विरोधकांसाठी बिनतोड होता. तत्कालीन शिवसेनेचे नेतृत्व शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे असताना त्यांनीही या मुद्द्यावर काँग्रेसला महाराष्ट्रात घेरले होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या राजकीय भाषणातही त्यांनी सोनिया गांधी यांच्यावर ‘ठाकरी’ भाषेत याच मुद्द्यावरून टीका केली होती. मात्र त्यानंतरही सोनिया गांधी यांनी त्याला प्रतिसाद देणे टाळलेच, हे राजकीय आरोप-प्रत्यारोप द्वेषापर्यंत जातील इतके व्यक्तिगत पातळीवर कधीच आणले नाहीत, त्याचाच परिणाम विद्यमान काळात पुढची पिढी राहुल आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे आदित्य यांच्यात टोकाची राजकीय कटुता निर्माण झाली नाही.*

*सार्वजनिक जीवनात शांत, संयमी आणि कमी बोलणार्या म्हणून त्यांची ओळख आजही आहे. त्यांनी पंतप्रधानपदासाठी निवड केलेले डॉ. मनमोहन सिंगही मूकदर्शक आहेत, अशी नवी टीका विरोधकांनी सुरू केली. मनमोहन सिंग यांचे ‘मौन’ किती बोलके होते आजच्या काळात स्पष्ट होत आहे आणि त्यांची सोनिया गांधी यांनी केलेली निवडही देशासाठी किती रास्त होती, याचाही प्रत्यय आज देशाला येत आहे. विचारपूर्वक वर्तन हे त्यांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य, म्हणूनच राजकीय जीवनात आपल्या वक्तव्याविषयी दिलगिरी व्यक्त करण्याची वेळ त्यांच्यावर कधीही आलेली नाही. आजही संसदेत त्यांच्या भाषणात राजकीय विरोध, दोषारोप जरी आढळत असला तरी कधीही व्यक्तिगत द्वेष त्यांच्या वक्तव्यातून समोर येत नाही. संघटन कौशल्य हा महत्त्वाचा गुण त्यांनी जोपासला. उदारीकरण, जागतिकीकरणाच्या बदलत्या काळात, माहिती आणि तंत्रज्ञानाच्या आजच्या आधुनिक भारताचा पाया काँग्रेसच्याच राजीव गांधी यांनी घालून दिल्याचे स्पष्ट होत असताना त्यांनी कधीही त्याचे राजकीय भांडवल केले नाही. सोबतच राजीव गांधी यांच्या निधनाला राजकीय सहानुभूतीचा आधार त्यांनी बनवला नाही. काँग्रेसचा त्याग, बलिदान आणि आजपर्यंतचा राजकीय इतिहासच त्यांनी समोर मांडून आपले राजकारण सुरू ठेवले.*

*विरोधकांच्या चारित्र्यहननाचा, त्यांच्यावर व्यक्तिगत टीकाटिपण्णीचा मार्ग सोनिया गांधींनी कधीही स्वीकारला नाही. पक्षातील सर्वच गटांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी संघटन कौशल्य त्या शिकत गेल्या. काँग्रेसचा पाया धर्मनिरपेक्षता आणि सर्वसमावेशक अखंड भारताचा विचार असल्याने त्याविरोधात जाणार्या मतांशी त्यांनी राजकीय जवळीक केली नाही. राजीव गांधी यांच्यानंतर आलेल्या पी.व्ही. नरसिंहराव सरकारमध्ये पक्षांतर्गत टीकेलाही त्यांना सामोरे जावे लागले. केंद्रातील तत्कालीन राजकीय अस्थैर्यामुळे देवेगौडा, गुजराल अशी सरकारे औटघटकेसाठी आली आणि गेली. बोफोर्स प्रकरणातील आरोपामुळे काँग्रेसच्या अस्थैर्याच्या याच काळात व्ही.पी. सिंग यांच्या बहुजनवादी मंडल आयोगाच्या राजकारणामुळे काँग्रेसचा परंपरागत बहुजन मतदार गांधी घराण्यापासून काही अंशी दुरावला गेला आणि व्ही. पी. सिंग यांच्या जनता पक्षात सहभागी झाला.सामाजिक न्याय, महिलांचे हक्क, गरीब वंचित घटकांविषयीची तळमळ त्यांच्या भाषणातून स्पष्ट होत गेली. इटली देशात जरी त्यांचा जन्म झालेला असला तरी भारतीय संस्कृतीशी जुळवून घेत त्यांनी ‘भारताची सून’ म्हणून आपली प्रतिमा यशस्वी केली असली तरी तोपर्यंत काँग्रेसची पिछेहाट झाली होती. पण २०14 च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा ऐतिहासिक पराभव झाला. त्यानंतर संघटनेत आणि पार्टीच्या राजकीय स्थितीत मोठे बदल झाले आणि त्यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदास नकार दिला. परंतु पक्षांतर्गत रेट्यामुळे त्यांना अंतरिम अध्यक्षपद घ्यावे लागले, घराणेशाहीच्या आरोपाला उत्तर म्हणून त्यांनी हा निर्णय जरी घेतला असला तरी त्यांनी गांधी घराण्यावरील लोकांचा विश्वास वाढवण्यात भरच घातली.*

# वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी सामान्य सल्ला, सद्यस्थितीत व्यवस्थापन कसे करा

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये भुरीचा प्रादुर्भाव झाल्यानंतर उत्पादनाचा दर्जा घटण्यासोबतच उत्पन्नामध्येही घट येते. प्रतिबंधात्मक उपाययोजना हीच भुरी नियंत्रणाची सर्वांत योग्य पद्धत आहे. एकदा आलेली भुरी नियंत्रित करण्यास अवघड असते. यासाठी वेलींचे सतत निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे.




**व्यवस्थापन**

रोग प्रतिबंधक जातींची लागवड करावी.

नत्र अन्नद्रव्याच्या अति वापराने भुरीची तीव्रता वाढते. तर पालाश अन्नद्रव्यामुळे पिकाची आंतरिक रोग प्रतिकारक्षमता वाढून, रोगाची तीव्रता कमी होते.

यासाठी अन्नद्रव्यांचा संतुलित मात्रेत वापर करावा.

दाटीवाटीने वाढलेल्या पिकामध्ये रोग प्रसारासाठी अनुकूल सूक्ष्म हवामान बनते व रोगाची तीव्रता वाढते.

यासाठी पिकाच्या ओळींमध्ये हवा खेळती राहील, अशाप्रकारे रोपांची संख्या ठेवावी.

भुरी रोगाच्या प्रतिबंधासाठी हवामानानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने, मेप्टिलडीनोकॅप (३७.५ ईसी) ०.७मि.ली. किंवा हेक्झाकोनॅझोल (५ ईसी) १ मि.ली. किंवा डायफेनोकोनॅझोल (२५ ईसी) ०.५ मि.ली. प्रति लिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी.

भाजीपाला पिकांवरील फुलकिडींचे नियंत्रणासाठी फिप्रोनिल १५ मिली प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी.

रोपवाटिकेतील वांगी, मिरची, टमाटे इ. भाजीपाला रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रती वाफा ५० ग्रॅम युरिया खताची मात्रा द्यावी. भाजीपाला रोपे पुनर्लागवड करावयाच्या शेतामध्ये जमीन वाफसा स्थितीत असताना मशागतीचे कामे सुरु करावीत.

उन्हाळी कांद्याच्या लागवडीसाठी गादी वाफे करुन रोपे तयार करण्यासाठी बियाणे पेरणी करावी व उन्हाळी हंगामासाठी शिफारस केलेल्या सुधारित जातीचा वापर करावा.

तसेच पेरणी पुर्वी झोस्पिरिलम + पीएसबी (झडइ) या जिवाणु संवर्धनाचा वापर करावा.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.

# रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी प्या हेल्दी सूप

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**



थंडीच्या दिवसात शरीराला विविध संसर्गाचा धोका असतो. या दिवसात आपण बहुतेकदा आजारी पडतो कारण आपल्या शरीरात आवश्यक व्हिटॅमिन्स आणि खनिजे नसतात. अशावेळी शरीर संसर्गापासून दूर राहावे यासाठी रोगप्रतिकारकशक्ती मजबूत असणे आवश्यक आहे. थंडीच्या दिवसात शरीर उबदार राहण्यासाठी आणि रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी तुम्ही सूप प्यायला हवे.




**सूप पिणे का आवश्यक ?**

सूपाचा आहारात समावेश केल्याने शरीर उबदार आणि निरोगी राहते. गरमागरम सूप प्यायल्याने सर्दीपासून बचाव होतो याशिवाय घरगुती सूप असल्याने कोणत्याही प्रकारचा धोका शरीराला नसतो. हिवाळ्यात मुबलक प्रमाणात फळे आणि भाज्या मिळतात. अशावेळी तुम्ही पालक आणि गाजर-बीटापासून तयार केलेला सूप पिऊ शकता.

**पालक सूप–** पालकात भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन्स –,उ, घ आणि लोह, फायबर असते. हे घटक शरीराची रोगप्रतिकारकशक्ती वाढवते. दररोज एक वाटी पालक सूप प्यायल्याने अशक्तपणा कमी होतो आणि वायरल इन्फेक्शनचा धोका निर्माण होत नाही. हे सूप पचनास मदत करते आणि पोटात उष्णता ठेवते.

**गाजर बीट सूप** – गाजर आणि बीट दोन्ही ऍंटी-ऑक्सिडंट्सने समृद्ध आहेत. गाजरात बीटा कॅरोटीन असते, जे डोळे आणि त्वचेसाठी फायदेशीर आहे. यातील लोह आणि फोलेट रक्ताभिसरण वाढवण्यास मदत करतात. हे सूप प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारकशक्ती मजबूत होते आणि वायरल इन्फेक्शन होत नाही.

**टोमॅटो सूप** – थंडीच्या दिवसात शरीराची रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी टोमॅटोचे सूप प्यायला हवे. टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन असतात. याशिवाय हे सूप झटपट तयार होते. ही माहिती केवळ सामान्य ज्ञानासाठी प्रदान केली आहे.

# मुख्यमंत्री, कृषीमंत्री, पालकमंत्र्यांचे अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवर दुर्लक्ष !

## फळ पीक विमा मदतीचे १७ कोटी ९० लक्ष रुपये तत्काळ वाटप करण्या विमा कंपनीची टाळाटाळ!

## रुपेश वाळके यांचा हिवाळी अधिवेशनामध्ये आंदोलन करण्याचा इशारा !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३मोर्शी–** अमरावती जिल्हा हा विक्रमी संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी कोट्यावधी रुपयांचा विमा हप्ता भरून हवामानवर आधारित २०२४ – २०२५ वर्षामध्ये आंबिया बहार संत्रा फळ विमा योजनेमध्ये सहभाग नोंदविला मात्र विमा कालावधी संपून ७ महिन्यांचा कालावधी लोटला तरीही जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पिक विम्याचे पैसे देण्यास युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी टाळाटाळ करीत असून २ दिवसामध्ये संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे त्यांच्या खात्यात जमा न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी थेट नागपूर येथील सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशना मध्ये तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शासनाला दिला असल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषीमंत्री दत्ता मामा भरणे व सत्ताधारी नेत्यांविरोधात अमरावती जिल्ह्यातील शेतकरी आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजनेचा परतावा



शेतकऱ्यांच्या खात्यात व्याजासह जमा करणेबाबत बाबत मोर्शी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष वाळके यांच्या नेतृत्वात मोर्शी तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात ६ तास ठिय्या आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर सदर विमा कंपनीने अमरावती जिल्ह्यामध्ये आंबिया बहार हंगाम २०२४-२५ मध्ये विमा परताव्याची एकूण मंजूर झालेली १७ कोटी ९० लाख ३५ हजार ८६० रुपये रक्कम केंद्र शासनाच्या (पिक विमा) पोर्टल वर चढवण्याचे काम चालू असल्याचे लेखी आश्वासन दिल्यामुळे आंदोलन थांबविण्यात आले होते त्यानंतर १५ दिवसांचा कालावधी लोटून सुद्धा संत्रा फळ पिक विमा दाव्याची रक्कम संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेली नसल्यामुळे अमरावती जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकरी आक्रमक झालेले आहेत. शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या, शेतकऱ्यांना विमा मदतीपासून वंचित ठेवणाऱ्या युनिव्हर्सल सोम्पो इन्शुरन्स विमा कंपनीवर कार्यवाही करून तत्काळ संत्रा फळ पिक विम्याचे पैसे १३ डिसेंबर २०२५ पर्यंत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्यास १४ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन सत्ताधारी नेत्यांना, मंत्र्यांना जागे करण्यासाठी अधिवेशना मध्ये आंदोलन करण्याचा ईशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांच्या तर्फे शासनाला देण्यात आला आहे.

# महाराष्ट्राला जीसीसी हब बनवण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा मुंबईत येणार जगातील सर्वात मोठा ऋछउ (जीसीसी) प्रोजेक्ट

## ४५ हजार रोजगार निर्माण होणार मायक्रोसॉफ्टसोबत एआय सहकार्याची मोठी घोषणा– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३मुंबई,**

महाराष्ट्राला (जीसीसी) हब बनवण्याच्या दिशेने हा अतिशय महत्त्वाचा टप्पा असून ब्रुकफील्ड कंपनी मुंबईत सुमारे २० लाख चौरस फूट क्षेत्रावर आशियातील सर्वात मोठे जागतिक क्षमता केंद्र उभारणार आहे. या प्रकल्पातून १५,००० थेट आणि ३०,००० अप्रत्यक्ष असे एकूण ४५,००० रोजगार निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.जिओ कन्व्हेशन सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नडेला, सीईओ, -छडठ , विक्रम आहुजा, ब्रुकफिल्डचे अंकुर गुप्ता यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यासाठी अनेक महत्त्वाच्या गुंतवणूक व तांत्रिक भागीदारी प्रकल्पाच्या अनुषंगाने यावेळी चर्चा करण्यात आली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि उद्योगसुलभ वातावरणामुळे महाराष्ट्र जागतिक कॅपेबिलिटी सेंटरचे पसंतीचे ठिकाण ठरत आहे. नव्या ऋछउ धोरणामुळे मोठ्या प्रमाणात कौशल्याधारित रोजगारनिर्मिती आणि आर्थिक वृद्धी साधली जाईल. जागतिक लॉजिस्टिक्स क्षेत्रातील अग्रणी कंपनी ऋशवए देखील मुंबई-नवी मुंबई विमानतळ परिसरात आपल्या ऋछउ आणि इतर ऑपरेशन्ससाठी गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे.मुख्यमंत्री म्हणाले की, मायक्रोसॉफ्टने आपल्या गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्राचा विचार करावा, याबाबत त्यांना विनंती केली असून सध्या देखील त्यांची सर्वात मोठी गुंतवणूक महाराष्ट्रामध्येच आहे. आगामी काळात मायक्रोसॉफ्ट मोठी गुंतवणूक करेल आणि महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्तेचे केंद्र बनवण्यासाठी पुढाकार घेईल.कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने गुन्हे नियंत्रणात महाराष्ट्राने दिलेले मॉडेल देशभरासाठी दिशा देणारेमुख्यमंत्री यांनी या ठिकाणी आयोजित Microsoft -I Tour



कार्यक्रमात सहभाग घेतला. सत्या नडेला यांनी महाराष्ट्र सरकारसोबत विकसित केलेल्या ऊीळाश -खजड प्लॅटफॉर्मचे विशेष प्रदर्शन या कार्यक्रमात केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने गुन्हे नियंत्रणात महाराष्ट्राने दिलेले मॉडेल देशभरासाठी दिशा देणारे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.सत्या नडेला यांच्या सोबत झालेल्या या बैठकीत आरोग्य, शिक्षण, कृषी आणि सरकारी सेवा वितरणासाठी विकसित करण्यावर चर्चा झाली. मायक्रोसॉफ्टने भारतातील त्यांच्या १७ अब्जांच्या सर्वात मोठ्या गुंतवणुकीत महाराष्ट्राला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.महाराष्ट्राने विकसित केलेल्या चर्रींशश्र प्लॅटफॉर्ममुळे सायबर आणि आर्थिक गुन्हे ३-४ महिन्यांच्या ऐवजी फक्त २४ तासांत शोधता येतात. ज्यामुळे लोकांचे पैसे वाचत आहेत आणि गुन्हेगारांना शोधणे अधिक जलद झाले आहे. यावेळी मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, उद्योग विभागाचे सचिव डॉ.अनबलगन, यांच्यासह संबंधित मान्यवर उपस्थित होते.

# केंद्र सरकारचे तीन मोठे निर्णय; जनगणनेसाठी ११ हजार कोटींच्या निधीला मंजुरी, शेतकऱ्यांसाठीही महत्वाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२नवी दिल्ली–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आज (१२ डिसेंबर) केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत केंद्र सरकारने तीन मोठे निर्णय घेतले आहेत.

केंद्र सरकारने जनगणनेच्या दिशेने एक महत्वाचं पाऊल उचललं असून जनगणनेसाठी ११ हजार ७१८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीन प्रमुख निर्णय घेण्यात आले, त्यापैकी एक जनगणनेच्या निधीच्या संदर्भातील, तर दुसरा कोळशाच्या संदर्भातील, तर तिसरा निर्णय हा शेतकऱ्यांच्या संदर्भातील आहे.

देशात होणाऱ्या जनगणनेसाठी आता केंद्र सरकारने ११ हजार ७१८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली. जनगणनेच्या तयारीसाठी या निधीच्या माध्यमातून आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत या निर्णयाची माहिती दिली. तसेच देशात पहिल्यांदाच डिजिटल जनगणना होणार असल्याचंही अश्विनी वैष्णव यांनी स्पष्ट केलं आहे. अश्विनी वैष्णव यांनी माहिती देताना सांगितलं की, २०२७ ची जनगणना ही पहिली डिजिटल जनगणना असेल. डेटाची सुरक्षितता लक्षात घेऊन जनगणनेची डिजिटल रचना करण्यात आली आहे. ही जनगणना दोन टप्प्यात केली जाईल. पहिला टप्पा १ एप्रिल ते सप्टेंबर २०२६ पर्यंत असेल. दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये होईल. १ एप्रिल ते सप्टेंबर २०२६ पर्यंत घरांची यादी आणि दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची गणना होईल. या डिजिटल जनगणनेच्या माध्यमातून मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे डेटा गोळा केला जाईल. तसेच हे ॲप्लिकेशन हिंदी, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषांमध्ये असेल, असं अश्विनी वैष्णव यांनी स्पष्ट केलं आहे.केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आजच्या निर्णयामध्ये कोळशाच्या लिलावासाठी ‘कोळसा सेतू’ या नवीन प्रणालीला मंजुरी देण्यात आल्याचा समावेश आहे. कोळसा सेतू म्हणजे भारत कोळसा उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी काही निर्णय घेण्यात येत आहेत. त्यापैकी हा एक निर्णय असेल. आयात कोळसा कमी करण्यासाठी केंद्र सरकार काही पावलं उचलत आहे, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे.केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२६ साठी दळलेल्या खोबऱ्यासाठी प्रति क्विंटल १२,०२७ रुपये आणि गोल खोबऱ्यासाठी प्रति क्विंटल १२,५०० रुपये किमान आधारभूत किंमत (चडझ) मंजूर केली आहे. यासाठी नाफेड आणि एनसीसीएफ या नोडल एजन्सी असतील. या निर्णयाचा फायदा शेकऱ्यांना होईल, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# शहरातील विकासकामे पूर्ण करताना उपयुक्ततेवर भर द्यावा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अमरावती महानगरपालिकेच्या विविध प्रश्नांबाबत आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नागपूर**

शहरातील विविध विकासकामे करताना त्याची भविष्यकालीन उपयुक्तता लक्षात घेऊन प्रकल्पांची निवड करावी. सद्यस्थितीत अपूर्ण असलेल्या प्रकल्पांसाठी जिल्हा नियोजन समिती योजनेतून निधीची तरतूद करून पूर्णत्वास न्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



विधान भवन येथे अमरावती महापालिकेच्या विविध प्रश्नांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार रवी राणा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, ऊर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अमरावती विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अमरावती शहरातील विविध विकासकामे कार्यान्वित करताना आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन दिला जाईल. परंतु, निवड केलेले प्रकल्प हे भविष्यकालीन परिस्थिती लक्षात घेऊन निवडावे. शहरातील राजकमल रेल्वे ओव्हर ब्रीज उड्डाणपुलाच्या बांधकामाची मर्यादा संपुष्टात आलेली आहे. यामुळे वाहतूक कोंडी वाढलेली आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी महारेलकडून उड्डाणपुलाचे पूर्णतः मजबूत पुर्नबांधणी कशी करता येईल, याबाबत मार्गदर्शन घ्यावे. अमरावती येथे माहिती तंत्रज्ञान पार्क विकसित करण्यासाठी स्थानिकांचा प्रतिसाद पाहून प्रकल्प रोजगारक्षम बनेल यादृष्टीने प्रयत्न करावेत. शहरात नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी अमृत योजने अंतर्गत प्रस्तावित जलशुध्दीकरण केंद्र, पाण्याच्या जलवाहिन्यांची कामे व पाणी टाकी बांधकाम आदी कामे तात्काळ पूर्ण करावीत.


शहरातील जुन्या योजना, प्रकल्प अगोदर कार्यान्वित झाल्यानंतरच नवीन प्रकल्प प्रस्तावित करावेत. प्रकल्पांची उभारणी झाल्यानंतर त्याचे महत्व व उद्देश कायम राहावा यादृष्टीने नियोजन करावे. प्रकल्पाच्या उभारणीनंतर तेथील देखभाल व दुरुस्ती कामे मिळण्याऱ्या महसूलातूनच करण्याचे नियोजन करावे.

शहरातील छत्री तलाव पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यात येत आहे. येथे नागरिकांच्या सुविधेसाठी आणि पर्यटक आकर्षित करण्यासाठी येथील निर्माणाधीन कार्य तातडीने पूर्ण करावेत. यासाठी जिल्हा नियोजन समिती योजनेचा निधीची तरतूद करावी, असे निर्देश दिले.

शहर स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून वाढत्या लोकसंख्येनुसार भूमिगत गटारांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. अमरावती हे विभागीय ठिकाण असूनही तेथील भूमिगत गटारे केवळ २० टक्के आहेत. स्वच्छता व आरोग्यविषयक बाबींसाठी गटार योजना तातडीने पूर्णत्वास नेण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. तसेच नेहरू मैदान परिसरातील जुनी लाल शाळा व टाऊन हॉल बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार या सर्व प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

शहरातील विकासकामे करताना नेहरू मैदान कायम ठेवण्यात यावे. शहरातील श्री अंबादेवी व श्री एकविरादेवी मंदीर परिसर वर्दळीचा आहे. या ठिकाणी भाविकांची गर्दी लक्षात घेता, प्रस्तावित विकासकाम पूर्ण करताना पहिले प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन रस्ते व नाले, सांडपाणी व्यवस्थापन, मंदीरालगतची दुकाने, भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा, वाहन पार्किंग व्यवस्था आदीबाबी लक्षात घेऊन प्रस्ताव सादर करावा.अमरावतीतील हनुमानगढी हे एक नव्याने विकसित होत असलेले धार्मिक आणि पर्यटनस्थळ आहे. यासंदर्भात चित्रफीत सादर करुन विविध प्रकल्पांबाबत माहिती देण्यात आली. या स्थळाच्या निर्मितीसाठी स्थानिकस्तरावर उपलब्ध बांधकाम साहित्य वापरण्याबाबत निर्देश देण्यात आले. याठिकाणी निर्माण करण्यात येणाऱ्या प्रकल्पांना टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जाईल. अमरावती महानगरपालिका मुख्यालय इमारतीच्या बांधकामासाठी योग्य पर्यायी जागा शोधण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच पीएम मित्रा पार्क अंतर्गत नवीन उद्योगांना आकर्षित करण्यासाठी एमआयडीसीने जमिनीचे दर कमी करावेत, असेही मुख्यमंत्री यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ‘डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार’



## श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती** – श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा ‘डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार’ यंदा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर झाला आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवाचे औचित्य साधून २७ डिसेंबर २०२५ रोजी अमरावतीत होणाऱ्या मुख्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. ५ लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम होणार असून मुख्यमंत्र्यांनी सोहळ्याला उपस्थित राहण्याचे मान्य केले आहे, असे हर्षवर्धन देशमुख यांनी सांगितले.

### विकासाभिमुख नेतृत्वाचा गौरव

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पुरस्कार प्रदान करण्यामागील भूमिका संस्थेने स्पष्ट केली. फडणवीस यांनी मराठा, ओबीसी आणि मागासवर्गीय समाजासाठी विविध कल्याणकारी योजना राबवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले आहे. ‘जलयुक्त शिवार’च्या माध्यमातून दुष्काळमुक्तीचा प्रयत्न, समृद्धी महामार्गासारखे प्रकल्प, गडचिरोलीतील नक्षलवाद नियंत्रणात आणून विकासाला दिलेली चालना, या त्यांच्या कारकीर्दीतील महत्वपूर्ण बाबींची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

या सोहळ्याला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे, आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके, आमदार प्रताप अडसड आणि आमदार रणधीर सावरकर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.जयंती महोत्सवात विदर्भातील शेतकऱ्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिलेल्या निधीतून शेतीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी महिलेला ‘शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार’, तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निधीतून पुरूष शेतकऱ्याला ‘स्व. शरद जोशी उत्कृष्ट पुरूष शेतकरी पुरस्कार’ देण्यात येणार आहे. १ लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे या दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप असून निवड समितीतर्फे लवकरच विजेत्यांची नावे घोषित केली जातील.

याशिवाय ‘श्रीमती विमलाबाई देशमुख (वैद्यकीय शिक्षण अभ्यासवृत्ती)’, ‘क्रातिज्योती सावित्रीबाई फुले (कृषी शिक्षण) अभ्यासवृत्ती’ दिली जाणार आहे. क्रीडा क्षेत्रातील विशेष कामगिरीबद्दल कस्तुरबा कन्या शाळेची विद्यार्थिनी भक्ती गजानन चौधरी हिला डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

# बहीरम यात्रा महोत्सव आढावा बैढक स्वच्छता, आरोग्य, माकडांच्या बंदोबस्त

## पार्कींगवर विशेष लक्ष देण्यासाठी एसडीओ यांचे निर्देश

**.विदर्भ प्रजासत्ताक दि. १३ परतवाडा :** विदर्भातील प्राचिण आणि प्रसिध्द असलेल्या बहीरम यात्रा महोत्सवाची आढावा बैठक अचलपुर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांच्या अध्यक्षतेखाली मंदीर संस्थान सभागृह बहीरम येथे पार पडली. यावेळी एसडीओ अरखराव यांनी परिसराची स्वच्छता, आरोग्य, माकडांचा बदोबस्त, झुल्याजवळ होत असलेली गर्दी सह पाकींगवर विशेष लक्ष देण्याबाबत संबंधित विभागांना निर्देश दिलेत. विदर्भात सर्वात अधिककाळ चालणारी बहीरम यात्रा महोत्सव २० डिसेबरपासून प्रारंभ होत असुन ३१ जानेवारी २०२६ पर्यंत चालेल या दरम्यान यात्रेत स्वच्छता ठेवण्यासंबंधी घंटागाडी नियमित फिरणार असुन कचरा करणाऱ्या व्यापारी अथवा यात्रे करुणा दंड ठोठावला जाणार आहे. तसेच मंदीर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांच्या अंगावर येणारे माकडांचा बंदोबस्त करण्याच्या सुचना वन विभागाला देण्यात आल्याची माहीती आहे.दरम्यान यात्रा महोत्सव यंदा शंभर पेक्षा अधिक दिशा दर्शक आणि माहीती सांगणारे फलक असणार आहेत शिवाय आरोग्य केंद्र पोलीस ठाणे आणि मंदीर संस्थानाची स्वतंत्र चमु यात्रे करुच्या मदती साठी सज्ज असणार आहे. बहीरम यात्रा नियंत्रक कक्षात संबधित विभागातील अधिकाऱ्यांचे नाव आणि मोबाईल क्रमांकाची यादी सुध्दा यावेळी उपलब्ध राहणार आहे.यात्रा कालावधी मध्ये सुटीच्या दिवशी विशेषता शनिवार रविवार ला जिल्हयातील आणि जिल्हयाबाहेरील बरेच भाविक दर्शनासाठी येत असतात अशावेळी गर्दी होवुन मोबाईल नेटवर्क जाम होत असल्याची तक्रार गतवर्षी जाणवली होती त्यामुळे यात्रेत मोबाईल सेवा काम करत नाही. संपर्क होत नाही. तेव्हा मोबाईल सेवा पुरविणाऱ्या कंपनीना याबाबत कळविणार असल्याची बैठकीत निश्चीत झाले आहे.खरपी, करजगाव, सर्फापुर फाटा, शिरजगाव कसबा, ब्राम्हणवाडा थडी रत्याचे सिंमेट बांधकाम सुरु असल्याने त्या रत्याने येणाऱ्या भाविकांसाठी दिशादर्शक फलक लावण्याची सुविधा संबधित कंत्राटदाराने करावी अशी सुचना देखिल देण्यात आली.वाहनाने मंदीरापर्यंत जाण्याकरीता यात्रे करुची नेहमी विश्वस्त किंवा पोलीसां .सोबत वाद होत असतो ही बाब लक्षात घेता यंदा पोलीस स्वता हे प्रकरण हाताळणार असल्याचे समजते.दरम्यान मंदिर विश्वस्त कडून उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव तहसीलदार सोनाली सूर्यवंशी, गटविकास अधिकारी निलेश वानखडे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.बैठकीस यावेळी चांदुर बाजार तहसिलदार सोनाली सुर्यवंशी, गटविकास अधिकारी निलेश वानखडे, ठाणेदार श्री. गवई, वैदयकीय अधिकारी व्ही आर चित्रकार, शाखाअभियंता पी एस शेटे, सहाय्यक महसुल अधिकारी कैलास गुळसुंदरे, मंडळ अधिकारी कविता नागले, विस्तार अधिकारी रामेश्वर रामागडे, विश्वत किशोर ठाकरे, अमर चौधरी, सुनिल ठाकरे, सचिन ठाकरे, आर बी जोशी, एस एस गोहत्रे, गणेश घोगरकर, गजानन राऊत, रमण भोवते, यासह आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थीत होते.



# बिबट्यासाठी ‘शेळ्या’, आणि विदर्भातील शेतकऱ्यांसाठी ‘डुकरं-रोही’?

## सरकारच्या निर्णयावर सभापती सुनिल पाटील गावंडे यांचा उपरोधिक सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३दर्यापूर :**

बिबट्याच्या उदरनिर्वाहासाठी जंगलात तब्बल एक कोटी रुपयांच्या शेळ्या सोडण्याची योजना आखून सरकारने वन्यजीव कल्याणाचा नवा अध्याय लिहिला आहे. मात्र दुसऱ्या बाजूला विदर्भातील शेतकरी जंगली डुक्कर, रोही आणि इतर वन्य प्राण्यांच्या धुमाकुळाने हैराण आहेत.या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे यांनी उपरोधाचा कडवा सुर लावत सरकारला थेट सवाल केला आहे

बिबट्यासाठी शेळ्या सोडता, पण आमच्या शेतात हाहाकार माजवणारी डुकरं-रोही पकडून तिकडे का नाही सोडत ?विदर्भातील शेतकरी रात्री शेतात काडीपेटी लावून पहारा देत असताना, सरकार मात्र ‘बिबट्यांच्या आहार व्यवस्थे’ ची काळजी घेत असल्याची भावना शेतकऱ्यांत निर्माण झाली आहे.

**शेतकऱ्यांचे दुखणे पण तेच**–रात्रीच्यारात्री डुकरांच्या टोळ्यांचा शेतात कहर, रोहीमुळे पिकांचे मोठे नुकसान, पंचनामे मिळण्यास विलंब, भरपाई मिळण्याची सोय विस्कळीत या पार्श्वभूमीवर सभापती सुनील पाटील गावंडे यांनी उपरोधाने म्हटले- सरकारने बिबट्यांच्या मेन्यूमध्ये शेळ्यांचा समावेश केला, छान आहे! पण आमच्यावर रोज मेजवानी करणाऱ्या डुकरं-रोही यांनाही एकदा पकडून जंगलात सोडा. मग बिबट्यालाही पर्याय मिळेल आणि आमची पिकंही वाचतील.

विदर्भातील शेतकरी समाजात या विधानाला मोठा प्रतिसाद मिळत असून सोशल मीडियावर सरकारच्या निर्णयावर जोरदार टीका सुरू आहे.

# कवायतीच्या आदेशावर शाळांचा प्रश्नचिन्ह

## दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक शक्य तरी कसे?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती :**

प्रजासत्ताक दिनासाठी होणाऱ्या सामूहिक कवायत संचलनाच्या सरावासाठी शिक्षण विभागाने दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक नेमण्याचा आदेश दिल्यानंतर जिल्ह्यातील शाळांपुढे मोठे संकट उभे राहिले आहे. संचमान्यतेनुसार शिक्षकांची संख्या अपुरी असताना प्रत्यक्ष सरावासाठी शिक्षक कसे उपलब्ध करायचे, असा प्रश्न बहुतेक शाळांनी उपस्थित केला आहे.





राज्यातील सर्व शासकीय व खासगी शाळांमध्ये देशभक्तिपर गीतांवर आधारित सामूहिक कवायत संचलन आयोजित करण्याचे आदेश प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संयुक्त परिपत्रकाद्वारे दिले आहेत. त्यामध्ये दर शुक्रवारी व शनिवारी विद्यार्थ्यांना कवायत सराव देताना प्रत्येक दहा विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक मार्गदर्शनासाठी असावा, अशी अट नमूद केली आहे.मात्र जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये ६० विद्यार्थ्यांपर्यंत केवळ दोनच शिक्षक, तर उच्च प्राथमिक स्तरावर ७० विद्यार्थ्यांपर्यंत दोन शिक्षकांच्या संचमान्यतेचा नियम असल्याने हा निकष अमलात आणणे अवघड असल्याचे शिक्षकांकडून सांगितले जात आहे. क्रीडा शिक्षकांची स्वतंत्र पदे बहुतेक शाळांमध्ये नसल्याने अडचण दुप्पट झाली आहे.या आदेशामुळे शाळांवर अतिरिक्त ताण येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे अध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले. संचमान्यतेतील मर्यादांमुळे दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक उपलब्ध करणे व्यवहार्य नाही, असे ते म्हणाले.

# कापूस खरेदीसाठी आता २३६८ किलो प्रतिहेक्टर मर्यादा, सुधारित उत्पादकता निश्चित, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मिळाला मोठा दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अकोला**

भारतीय कापूस महामंडळामार्फत कापूस खरेदीच्या मर्यादेमुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली. मर्यादापेक्षा अधिक उत्पादन असल्याने उर्वरित कापूस विकावा कुठे असा प्रश्न निर्माण झाला. या प्रकरणी भाजप पक्ष प्रतोद आमदार रणधीर सावरकर यांनी सभागृहात मुद्दा उपस्थित केला. त्यावर शासनाने तत्काळ निर्णय घेऊन कापूस खरेदीसाठी आता २३६८ किलो प्रति हेक्टर मर्यादा सर्व जिल्ह्यांसाठी निश्चित केली. या संदर्भात कृषी आयुक्तांनी सुधारित परिपत्रक काढले आहे.शासनाच्या खरेदी केंद्रावर किमान आधारभूत किंमतीनुसार कापूस विक्रीसाठी शेतकरी घेऊन जात आहेत. शेतकरी अद्ययावत तंत्रज्ञान, सिंचन आदींचा वापर करून कमाल उत्पादन घेण्याचे प्रयत्न करतात. काही शेतकऱ्यांचे सरासरी उत्पादनापेक्षा अधिकचे उत्पादन खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आल्यावर मर्यादेमुळे त्या शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागले.



प्रचलित पद्धतीनुसार भारतीय कापूस महामंडळाला कापूस पिकाची सरासरी उत्पादकता राज्यस्तरावरुन निश्चित करुन देण्यात येत नव्हती.

या वर्षी मात्र भारतीय कापूस महामंडळाने उत्पादकता राज्य स्तरावरुन निश्चित करण्याची सूचना निर्गमित केल्या आहेत. राज्यस्तरावरुन उत्पादकता ही महसूल मंडळामध्ये घेतलेल्या एकूण १२ पीक कापणी प्रयोगांवर अधारीत असते. पीक कापणी प्रयोग हे ‘रॅण्डम’ पद्धतीने निवडलेल्या कापूस पिकाच्या प्लॉटमधून घेण्यात येतात. यामध्ये सर्वच उत्तम तसेच अत्यंत कमी उत्पादन असलेल्या कापूस पिकाच्या प्लॉटचा समावेश असतो. या वस्तुस्थितीचा विचार करता ३ डिसेंबरला निर्गमित केलेल्या परिपत्रकामध्ये पीक कापणी प्रयोगातील उच्चतम उत्पादकता असलेले २५ टक्के पीक कापणी प्रयोगातील उत्पादनानुसार जिल्हानिहाय प्रति हेक्टरी सुधारित उत्पादकता निश्चित करण्यात आली होती.

सुधारित उत्पादकता निश्चित केल्यावरही खरेदी केंद्रावर त्यापेक्षाही अधिक उत्पादकता असलेले शेतकरी कापूस उत्पादन घेऊन येत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ०३ डिसेंबर रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकामध्ये, राज्यातील उच्चत्तम उत्पादकता असलेल्या तीन जिल्ह्याची सरासरी विचारात घेऊन राज्यातील सर्व जिल्ह्यांसाठी खरीप २०२५ मध्ये उत्पादित झालेल्या कापूस खरेदीसाठी २३६८ किलो प्रति हेक्टर ही उच्चतम मर्यादा ठेवण्यात येत असल्याचे कृषी आयुक्तांकडून स्पष्ट करण्यात आले. या उत्पादकतेचा वापर केवळ २०२५ मध्ये उत्पादित झालेला कापूस खरेदी केंद्रावर विक्री करण्यासाठीच गृहीत धरण्यात येणार आहे.

# तिवस्यातून जाणाऱ्या महामार्गावर अपघात वाढले

## उपायोजनांसासाठी अधिकाऱ्यांची संयुक्त पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ तिवसा**

तहसील कार्यालयातील महिला कर्मचार्याचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर महसूलचे अधिकारी जागे झाले आणि महामार्गावरील वाहतूक व्यवस्थेच्या सुधारणेच्या दृष्टीने शुक्रवारी शहरातून जाणार्या संपूर्ण रस्त्याची संयुक्त पाहणी केली. तिवसा शहरातून जाणार्या राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या अपघातांची मालिका नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. चौपदरीकरण पूर्ण झाल्यानंतरही अपघातांचे प्रमाण नियंत्रणात येण्याऐवजी सातत्याने वाढत आहे. विशेषतः तिवसा बसस्थानक परिसर हा अपघातांचा हॉटस्पॉट बनला असून, काही दिवसांपूर्वीच तहसील कार्यालयातील एका महिला कर्मचार्याचा या ठिकाणी झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाल्याने शहरात हळहळ व्यक्त होत आहे. यापूर्वीही याच ठिकाणी दुचाकीला अचानक पेट लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. या वारंवार घडणार्या दुर्घटनांच्या पृष्ठभूमीवर नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी असून सुरक्षिततेबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी अधिक तीव्र झाल्याने वाढत्या अपघातांमुळे विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला निवेदने दिली. या



संदर्भात तिवसा शहरातील मुख्य चौकात बसस्थानकासमोर आणि पेट्रोल पंप चौकात स्पीडब्रेकर्स व झेब्रा क्रॉसिंग बसविण्याची ठोस मागणी करण्यात आली. दोन्ही ठिकाणी दिवसभर मोठी वर्दळ असून वाहतूक नियंत्रणाची कोणतीही प्रभावी साधने नसल्याने अपघाताचा धोका वाढत आहे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन तिवसा तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांनी स्वतः भेट देऊन संयुक्त पाहणी केली. त्यांच्यासोबत नायब तहसीलदार नरेंद्र कुरळकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अनुराग खडसे, तिवसा पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक अमोल तुळजेवार, तिवसा बसस्थानक प्रमुख प्रतीक मोहोळ तसेच आयआरबीचे मुख्य अभियंता प्रवीण नागपुरे तसेच सचिन राऊत उपस्थित होते. संयुक्त पाहणीनंतर तहसीलदार डॉ. मयुर कळसे यांनी आयआरबीचे महाव्यवस्थापक रवींद्र चोरे यांना पंचवटी चौक, पेट्रोल पंप चौक आणि बसस्थानक चौक या महत्त्वाच्या ठिकाणी तात्काळ गतिरोधक, झेब्रा क्रॉसिंग, वाहतूक चिन्हे, तसेच इतर सुरक्षाविषयक आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. सोबतच तिवसा बसस्थानकासमोरील भागातील नाली रुंदीकरण करून देण्याचे आश्वासन दिले.

# महायुती सरकारच्या कार्यकाळात गेल्या ३ वर्षात कुपोषणामुळे १४ हजार ५२६ बालमृत्यू

## आरोग्यमंत्र्यांची विधानसभेत धक्कादायक कबुली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३नागपूर** – महायुती सरकारच्या कार्यकाळात म्हणजे २०२२-२३ ते २०२४-२५ या ३ वर्षात राज्यात कुपोषणामुळे१४ हजार ५२६ बालमृत्यू झाले, अशी कबुली आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली. हे बालमृत्यू मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये शून्य ते पाच वर्षे वयोगटातील मुलांचे असल्याची धक्कादायक माहिती आबिटकर यांनी विधानसभेत उपस्थित झालेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात देण्यात आली आहे.

कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यूं रोखण्यासाठी राज्य सरकार करोडो रुपये खर्च करुन विविध योजना राबवीत आहे. पण कुपोषणाचे प्रमाण वाढले असून ४९ हजार बालमृत्यू झाले आहेत का, असा प्रश्न स्नेहा दुबे, मनोज जामसुतकर, चेतन तुपे आदींनी विधानसभेत उपस्थित केला होता. त्यावर आबिटकर यांनी १४ हजार ५२६ बालमृत्यू झाल्याचे म्हटले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाश्वत विकास ध्येय २०३० नुसार नवजात शिशू मृत्यू दर प्रति एक हजारामागे १२ पेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या जनगणना आयुक्तांनी २०२५ मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार राज्याचा २०23 चा नवजात मृत्यू दर प्रति हजार बालकांमागे ११ आहे. राज्य शासनाने शाश्वत विकासाचे ध्येय साध्य केले असल्याचा दावा आबिटकर यांनी केला आहे. पूरक पोषण आहार, नियमित आरोग्य तपासणी, डॉ. भारतरत्न एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना, सॅम



बालकांसाठी विशेष उपक्रम, पोषण अभियन आदी योजना राबविल्या जात आहेत. नर्चर अ‍ॅपद्वारे कुपोषित बालकांचा पाठपुरावा करण्यात येतो, असे नमूद करुन आबिटकर यांनी नवजात शिशूंच्या काळजीसाठी असलेल्या योजनांचीही माहिती दिली.

करोना मृत्यूमध्ये वाढ

राज्यात करोनामुळे मृत्यू होण्याचे प्रमाण गेल्यावर्षीच्या तुलनेत वाढले असल्याचे आबिटकर यांनी सचिन पाटील, मनोज कायंदे आदींनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना लेखी उत्तरात नमूद केले आहे. करोनामुळे जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ मध्ये ३५ मृत्यू झाले होते आणि ५५२४ नागरिकांना लागण झाली होती.

तर जानेवारी ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत करोनाच्या रुग्णांची संख्या २७८१ असूनही मृत्यूंची संख्या वाढून ४६ वर गेली आहे.

हिवतापाच्या रुग्णांची संख्याही याच कालावधीत गेल्यावर्षी १८ हजार ९२ इतकी होती व मृत्यू २० होते, तर यंदा १९८५५ इतकी होती व मृत्यूी २० झाले आहेत. हिवतापाच्या रुग्णांची संख्या २०२७ पर्यंत शून्यावर आणून २०३० पर्यंत उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले असल्याचे आबिटकर यांनी म्हटले आहे.

# विधानभवन परिसरात स्वतंत्र विदर्भ राज्याचे नारे , महाराष्ट्र दिवाळखोर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर**

नागपुरातील हिवाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी विधानभवन परिसरात चक्क पत्रकाराकडूनच स्वतंत्र विदर्भ राज्याचे नारे दिले गेले. त्यानंतर सुरक्षा यंत्रणेकडून त्यांना ताब्यात घेतले गेले. यादरम्यान पत्रकाराकडून महाराष्ट्र दिवाळखोर असल्याचे सांगत राज्य सरकारवर आरोप केलेत

नागपुरातील हिवाळी अधिवेशनाचे काम शुक्रवारी सुरू होते. दुपारी ज्येष्ठ पत्रकार व विदर्भवादी नेते प्रकाश पोहरे विधीमंडळ परिसरात आले. त्यांनी विधान सभेच्या पायरीजवळ आल्यावर अचानक स्वतंत्र विदर्भ राज्य झालेच पाहिले, असे नारे देणे सुरू केले. दरम्यान सुरक्षा रक्षकांकडून त्यांना रोखण्याचा प्रयत्न झाला. परंतु त्यांनी प्रथम तुम्ही विधीमंडळ परिसरात पत्रकारांना बोलण्यापासून कसे रोखू शकता? हा प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर प्रथम सुरक्षा यंत्रणेच्या जवानांनी पोहरे यांना नारे न देण्याबाबत समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु ते एकत नसल्याचे बघत शेवटी त्यांना ताब्यात घेतले गेले.

दरम्यान सुरक्षा रक्षकांकडून पोहरे यांना विधानभवन परिसरातील मुख्य सुरक्षा रक्षकांच्या कक्षाकडे नेले जात होते. यावेळी प्रसिद्धी माध्यमांच्या कॅमेरेही पोहरे यांच्या सोबत जात होते. यावेळी पोहरे म्हणाले, महाराष्ट्रावर १० लाख रुपये कोटींचे कर्ज झाले असून हे राज्य दिवाळखोर झाले आहे. त्यामुळे या राज्यात राहून विदर्भाचा विकास शक्य नाही. विदर्भात यापूर्वी केवळ १० दिवसांचे तर आता केवळ ७ दिवसांचे अधिवेशन घेतले जात आहे. त्यामुळे विदर्भाला न्याय मिळू शकत नाही. आताचे अधिवेशन



नौटंकी असून हे बंद करायला हवे. यानंतर अधिवेशन एक महिन्याहून कमी कालावधीचे घेतल्यास ते येथील जनता होऊ देणार नाही, असारी इशारा पोहरे यांनी यावेळी दिला.

देवेंद्र फडणवीसांकडून पूर्वी स्वतंत्र विदर्भाची मागणी केली जात होती. परंतु आता ते यामुद्यावर बोलत नसल्याचे प्रश्न प्रसिद्धीमाध्यमांनी उपस्थित केल्यावर पोहरे म्हणाले, मुख्यमंत्रीपद मिळाल्याने देवेंद्र फडणवीस यांना संपूर्ण राज्याची तिजोरी लुटायला मिळाली आहे. त्यामुळे त्यांना स्वतंत्र विदर्भ राज्याचा विसर पडल्याचेही पोहरे यांनी सांगितले.

### दोन वर्षांपूर्वी विधानसभेच्या पत्रकार गॅलरीत घोषणा

महाराष्ट्र विधीमंडळाचे कामकाज नागपुरात २०२३ मध्ये सुरू असतांनाही प्रकाश पोहरे यांनी विधानसभेतील पत्रकार गॅलरीतून स्वतंत्र विदर्भ राज्याचे नारे दिले होते. त्यानंतरही विधानभवनातील सुरक्षा यंत्रणेकडून त्यांना ताब्यात घेतले गेले होते. त्यानंतर २०२५ मध्ये पून्हा विधानभवन परिसरात पोहरे यांनी विदर्भ राज्याचे नारे दिले आहे.

# शिरजगाव मोझरी मार्गावर नादुरुस्त बसेसच्या धावा

## सलग दोन दिवस बसेस फेल पडून शिरजगावातच मुक्कामी

### विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यात अडचणीचा सामना, प्रवासीही हैराण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३शिरजगाव मोझरी :**

एसटी महामंडळातील भंगार नादुरुस्त बसेस ग्रामीण भागातील प्रवासी वाहतुकीसाठी पाठवल्या जात आहे. त्याचा परिणाम प्रवासी वाहतुकीवर होत असून, विद्यार्थ्यांना सुद्धा त्याचा मोठा फटका बसतो आहे. अमरावती – शिरजगाव मोझरी मार्गावर धावणाऱ्या नादुरुस्त बसेसचा गावकऱ्यांना चांगलाच फटका बसला आहे.



जळका, शेंदोळा, सालोरा, धोत्रा, शिरजगाव मोझरीच्या प्रवाशांसह विद्यार्थ्यांना गेल्या दोन दिवसांपासून मनस्ताप सहन करावा लागतो आहे .शिरजगाव मोझरी येथे १० डिसेंबर रोजी येणारी लास्ट टाईम बसचा बेल्ट तुटल्याने बस एकदम जमीनदोस्त झाली होती. बसची बॉडी पूर्णतः जमिनीवर आली होती. त्यामुळे बस दुसऱ्यादिवशी दुरुस्त करून अमरावती नेण्यात आली. तर १२ डिसेंबर रोजी मुक्कामी असलेली बसच्या बॅटरी डाऊन झाल्याने बस ठप्प पडली परिणामी, अमरावती – शिरजगाव मोझरी मार्गावरील गावकऱ्यांना मनस्थाप सहन करावा लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून एसटी बसचा लेटलतीफपणा आणि नादुरुस्त बसेसमुळे विद्यार्थ्यांचे सुद्धा मोठे नुकसान होत असल्याने पालकांमध्येही नाराजी वाढली आहे.एसटी महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विद्यार्थ्यांच्या प्रवासी वाहतुकीची गंभीर दखल घेतली आहे. नियमित आणि दुरुस्त वाहने रस्त्यावर सोडण्याचे आदेश आहे. मात्र, त्यानंतरही अशा नादुरुस्त वाहनांचा रस्त्यावर प्रवासी वाहतूक केल्या जात असल्यास याला दोषी कोण ? असा प्रश्न निर्माण होत आहे.

नियमित नादुरुस्त बसेसचने प्रवासी वाहतूक होत असल्याची तक्रार अमरावती विभाग नियंत्रक निलेश बेलसरे यांच्याकडे केली आहे. शिवाय, नियमित चांगल्या बसेस नियमित वेळेत पाठवण्याची मागणी सुद्धा फोनद्वारे केली आहे.– प्रशांत कांबळे, शिरजगाव मोझरी

# मराठी हौशी नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी अमरावती येथे होण्याची शक्यता



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती–**

आमदार रवी राणा यांचे सह नाट्य परिषद मध्यवर्ती चे नियामक मंडळ सदस्य ड. प्रशांत देशपांडे आणि अमरावती नाट्य परिषद अध्यक्ष ड. चंद्रशेखर डोरले यांनी अधिवेशनाचे दरम्यान मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि सांस्कृतिक मंत्री ड. आशिष शेलार यांची भेट घेऊन ६४ व्या हौशी मराठी नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी अमरावती येथे देण्याची मागणी केली. अंतिम फेरी अमरावती मिळावी या मागणी करिता आमदार प्रतापदादा अडसड, आमदार राजेश वानखडे, राज्य सभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे तसेच माजी खासदार सौ. नवनीत राणा यांनी देखील सांस्कृतिक मंत्री ड. आशिष शेलार यांना पत्र देऊन या मागणीला समर्थन दिले आहे. या प्रसंगी भा. ज. पा. अमरावती शहर – जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे उपस्थित होते. ही अंतिम फेरी अमरावती येथे आयोजित करण्याकरिता मा. ना. ड. आशिष शेलार यांनी संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय श्री. बिभीषण चवरे यांना लेखी स्वरूपात कळविले सुद्धा आहे. मराठी नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी अमरावती येथे पहिल्यांदाच होणार असून अमरावतीकर रसिकांना संपूर्ण राज्यभरातील पारितोषिक विजेत जवळपास ४० नाटकं पाहण्याची सुवर्ण संधी उपलब्ध होणार आहे.

# चार तहसीलदारासहित १० जण निलंबित

## चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानंतर मोठी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३पुणे**

पुण्याच्या मावळ तालुक्यात वनीकरणासाठी राखीव क्षेत्रात झालेल्या ९० हजार ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खननाप्रकरणी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठी कारवाई केली आहे. या गैरव्यवहारात दोषी आढळलेल्या चार तहसीलदार, चार मंडल अधिकारी आणि दोन तलाठी अशा नऊ जणांचे निलंबन करण्याचे आदेश दिले.

परवानगीपेक्षा ९० हजार ब्रास अधिक उत्खनन झाल्याचे ईटीएस मोजणीत निष्पन्न झाले आहे. त्यांच्यावर फौजदारी व महसूली अधिनियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. आमदार सुनील शेळकेंनी मावळच्या उत्खनन गैरव्यवहाराबाबत आज शुक्रवारी विधानसभेत लक्षवेधी मांडली. त्यानंतर उत्खनन प्रकरणात अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली. या प्रकरणातील अधिकारी आठ महिने टाळाटाळ करत अनधिकृत उत्खनन करणाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप शेळके यांनी लक्षवेधीदरम्यान केला होता.

महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, विभागीय आयुक्तांनी दोनदा चौकशी केली. गट क्रमांक ३६, ३७, आणि ३८ मध्ये खाणपट्टे मंजूर करण्यात





आले होते. मात्र ३५, ४१, ४२, आणि ४६ या गट क्रमांकांवरही गौण खनिजाचे तात्पुरत्या स्वरूपाचे उत्खनन झालं आहे'.

ईटीएस मोजणीमध्ये ३ लाख ६३ हजार ब्रासची परवानगी असताना एकूण ४ लाख ५४ हजार ब्रास उत्खनन झाल्याचे आढळून आले. एकूण ९० हजार ब्रास जास्तीचे उत्खनन झाल्याचे समोर आले.

### हे आहेत निलंबित अधिकारी

मंडळ अधिकारी : संदीप बोरकर, माणिक साबळे, अजय सोनवणे आणि रमेश कदम.

तहसीलदार : मनजीत देसाई, मधुसूदन बारगे, विक्रम देशमुख, जोगेंद्र कटियार (या काळात कार्यरत असलेले चार तहसीलदार.

तलाठी : दीपाली सनगर , गजानन सोटपल्लीवार

# मेळघाटच्या आरोग्य यंत्रणेवर आरोग्यमंत्र्यांची तीव्र नाराजी

### आदिवासी मध्य प्रदेशातील बंगाली डॉक्टरच्या दारी : हतरूमध्ये डॉक्टर, कर्मचारी बेपत्ता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३नागपूर–** गुरुवारी आरोग्यमंत्र्यांनी मेळघाटचे आमदार व यंत्रणेसोबत नागपूर येथे बैठक घेत समस्या जाणून घेतल्या. दुसरीकडे याच बैठकीत अतिदुर्गम हतरू आरोग्य केंद्रात डॉक्टर, कर्मचारी बेपत्ता आणि एकताई उपकेंद्राला मागील सात वर्षापासून टाळे लागले असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. परिणामी, आदिवासी मध्य प्रदेशातील खेड्यांमधून उपचार देणाऱ्या कथित बंगाली डॉक्टरांच्या दारी जाऊन उपचार करीत असल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आला



आहे. यावर आरोग्यमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी गुरुवारी नागपूर येथील आरोग्य उपसंचालकांच्या कार्यालयात मेळघाटचे आमदार केवळराम काळेसह वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यात सिकलसेल, रिक्त जागा, यासह मेळघाटातील आरोग्य सचिवांचा दौऱ्यातून पुढे आलेल्या समस्या त्यांनी यावेळी जाणून घेतल्या. मेळघाटात आरोग्य यंत्रणा अजूनही कुचकामी ठरली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी करतात तरी काय, त्यांच्यावर सर्वप्रथम कारवाईचा सूर यावेळी लागला.

आरोग्यमंत्री करणार पुन्हा दौरा

आरोग्यमंत्र्यांनी यापूर्वीच मेळघाटचा दौरा केला होता. मात्र, त्यानंतर कुठलाच बदल आरोग्य यंत्रणेत झाला नाही. गुरुवारी बैठकीत त्यांनी मेळघाट दौऱ्याचे संकेत दिले.

# श्री संत गाडगे बाबांचा ६९ वा पुण्यतिथी महोत्सव १४ डिसेंबर पासून प्रारंभ

### प पु सु श्री महेश्वरी देवी यांचे भागवत १४ ला शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती–** लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले श्री गाडगेबाबा नगर येथील श्री संत गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती या ठिकाणी श्री गाडगेबाबांचा ६९ वा पुण्यतिथी महोत्सव १४ डिसेंबर पासून शुभारंभ होणार आहे उत्सव २१ डिसेंबर पर्यंत राहणार असून या दरम्यान भजन पूजन ज्ञानदान विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून प प्पू सितारामजी बाबा यांचे कृपा सत्र शिक्षा सु श्री महेश्वरी देवी यांचे श्रीमद् भागवत कथा आयोजित केली असून रोज दुपारी एक ते ४:३० पर्यंत हे ज्ञानदान होणार आहे १४ डिसेंबरला सकाळी दहा वाजता गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन व पुण्यतिथी महोत्सव शुभारंभ महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त सौ सौम्या चांडक शर्मा यांच्या हस्ते व संस्थेचे विश्वस्त श्री बापूसाहेब देशमुख , समाजसेवक डॉक्टर राजकुमार लंगडे, प पु सु श्री महेश्वरी देवी व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत पूजन होणार आहे त्यानंतर दुपारी बारा तीस ते एक अंध अपंगांना अन्नदान कैलासवासी नामदेवरावजी रोडे यांचे स्मृतीस प्रित्यर्थ रोडे परिवार अमरावती तर्फे दैनंदिन मध्ये रोज ह भ प लक्ष्मीबाई गहूकार यांचे गाडगे बाबांच्या जीवनावर जीवन कार्य प्रवचन हरिपाठ सामुदायिक प्रार्थना व त्यानंतर साडेसात ते साडेआठ भक्ती संगीत ज्ञानेश्वर जी सौदागरे व त्यांचा संच त्यानंतर नऊ ते साडेदहा ह भ प पंकज महाराज पोहोकार(सोनी मराठी प्रेम) यांचे राष्ट्रीय कीर्तन होणार असून यादरम्यान आठ दिवस दैनंदिन कार्यक्रम आयोजित केले आहे. तरी या ज्ञानदान सप्ताहामध्ये भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख व्यवस्थापक प्रकाश महात्मे उत्सव समिती प्रसिद्धीप्रमुख गजानन देशमुख दर्यापूर यांनी केले आहे

# राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताकदि १३नागपुर** राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये तब्बल ३७ हजार शिक्षकांची पद रिक्त आहेत. जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे, सरकारने या रिक्त जागा मर्यादित कालावधीत भराव्यात अशी मागणी आज विधानसभेत केली.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या काळात राज्यातील जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या बदलीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. एकीकडे शिक्षकांची पदे रिक्त आहे, दुसरीकडे राज्यात ५५ हजार जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याच्या बातम्या येतात. शिक्षण हा इतका महत्वाचा विषय असूनही सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे. चंद्रपूर जिल्ह्यात शिक्षकांची पदे रिक्त आहे. सात वर्ग आणि फक्त तीन शिक्षक विद्यार्थी काय शिकणार? त्यामुळे सरकारने राज्यात शिक्षकांची किती रिक्त पदे आहेत, आणि एका मर्यादित कालावधीत या जागा भराव्या अशी मागणी केली.यावर उत्तर देताना मंत्री जयकुमार गोरे यांनी राज्यात १५ हजार शिक्षकांची पद रिक्त असल्याची माहिती सभागृहात दिली, यावर आक्षेप घेतला. राज्यात ३७ हजार शिक्षकांची पदे रिक्त आहेत, अधिकारी सरकारची दिशाभूल करत आहे, सरकारच्या पोर्टलचे नाव पवित्र असले तरी अपवित्र काम सुरू आहे.या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री गोरे यांनी मान्य केले चंद्रपूर जिल्ह्यात ४७२ जागा रिक्त आहेत. राज्यात शिक्षक भरतीबाबत नवीन पद्धत आणण्याची गरज आहे असे मंत्री जयकुमार गोरे म्हणाले.

# दक्षिण आशियातील सर्वात मोठ्या उड्डाण प्रशिक्षण संस्थेत दोन विमानाचे पहिले यशस्वी लँडिंग

### एअर इंडिया एफटीओने टाकले पाऊल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**

अमरावती विमानतळावर एअर इंडिया फ्लाइट ट्रेनिंग ऑर्गनायझेशनच्या (एफटीओ) विमानाचे पहिले ऐतिहासिक आगमन शुक्रवार १२ डिसेंबर रोजी यशस्वीरीत्या झाले. दोन आधुनिक डायमंड डिए-४२ मल्टी-इंजिन प्रशिक्षण विमानांचा त्यात समावेश आहे. विदर्भातील विमान प्रशिक्षण केंद्र सुरू होण्यासाठीच एक अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण झाला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दूरदर्शी नेतृत्व, सातत्यपूर्ण सहकार्य आणि राज्यातील विमानतळ विकासाबाबतच्या ठाम भूमिकेमुळे हे शक्य झाले आहे. विमान वाहतूक पायाभूत सुविधांच्या वेगवान उभारणीत त्यांच्या नेतृत्वाने निर्णायक भूमिका बजावली आहे. तसेच या महत्त्वपूर्ण कार्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी एमएडीसीच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी दिलेले



प्रभावी मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न अत्यंत मोलाचे ठरले. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे अमरावती विमानतळाच्या कार्यक्षमतेत लक्षवेधी प्रगती झाली असल्याचे एअर इंडिया फ्लाइट ट्रेनिंग ऑर्गनायझेशनच्या वतीने सांगण्यात आले. अमरावती विमानतळाच्या विकास प्रवासातील एक परिवर्तनात्मक पाऊल पुढे पडले आहे. ते विमान प्रशिक्षण व विमान वाहतूक क्षेत्राला नवी दिशा देणारे आहे. ही घटना राज्याच्या विमान वाहतूक क्षमतावृद्धीकडे केलेल्या ठोस पावलांचे द्योतक असल्याचे एअर इंडिया फ्लाइट ट्रेनिंग ऑर्गनायझेशनचे म्हणने आहे.

# सोयाबीनच्या बाजारात भ्रष्टाचाराचे दलाल

## मंत्र्याच्या ओएसडी च्या नावानं लाखोंची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अकोला**

आसमानी संकटाने उद्धवस्त झालेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या खिशावर बाजारातील भ्रष्टाचारी सुलतानी दलालांनी डल्ला मारायला सुरुवात केलीय.. अकोल्यातल्या अकोटमधील नाफेडच्या सोयाबीन खरेदी केंद्रावर सोयाबीनची अनेक वाहनं सोयाबीनची खरेदी न केल्यानं अडकून पडलेत... मात्र या शेतकऱ्यांच्या अडवणुकीमागे आर्थिक रॅकेट दडल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केलाय... सोयाबीन खरेदी केंद्रावर प्रति वाहन ५ हजार रुपये वसुल केले जात आहेत... असा आरोप करत शेतकऱ्यांनी लाचखोर ग्रेडर आरुष पटेलचा भांडाफोड केलाय...मात्र सोयाबीन खरेदी केंद्रावर कशा पद्धतीने घोटाळा केला जातो... त्याची शेतकऱ्यांनी सांगितलेली मोडस ऑपरेंडी नेमकी कशी आहे..प्रति वाहन ५ हजार रुपये न दिल्यास माल नाकारणे मालाची प्रतवारी कमी करणे, वाहनं जास्त वेळ अडवून



ठेवणेअकोलाच नाही तर नांदेड आणि यवतमाळमध्येही नाफेडची सोयाबीन केंद्र भ्रष्टाचाराचे अड्डे बनत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केलाय... त्याचे पडसाद अधिवेशात उमटलेत... काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांनी थेट सोयाबीनच्या पिशव्या विधानसभेत घेऊन जात लाचखोर अधिकाऱ्यांकडून उत्तम दर्जाचं सोयाबीन नाकारलं जात असल्याचा आरोप केलाय.... बीडमधील अखिल काझी नावाचा व्यक्ती पणनमंत्री रावल यांच्या ओएसडीच्या नावाने सोयाबीन केंद्रासाठी ४ लाख रुपयांची मागणी केल्याचा खळबळजनक आरोप वडेट्टीवारांनी केलाय.खरंतर राज्यात पणन विभागाने नाफेडच्या ७८६ सोयाबीन केंद्रांना मंजूरी दिलीय... त्यापैकी नाफेडच्या नियमांवर बोट ठेवत ४६१ केंद्रच सध्या सुरु आहेत...

# भाजपा अमरावती शहर जिल्हा तर्फे अमरावती मनपा निवडणूक करिता इच्छुक उमेदवार मुलाखतीला आजपासून सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

अमरावती मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने टप्पा टप्प्याने तयारी सुरू करण्यात आलेलीबाहे, यामध्ये पहिल्या टप्प्यात संपूर्ण प्रभागात निरीक्षकांनी प्रभाग निहाय पदाधिकाऱ्यांचे मत नोंदवून घेतले, दुसऱ्या टप्प्यात इच्छुक उमेदवार अर्ज वितरण दिनांक १० डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२५ असे सतत ३ दिवस सुरू होते,यामध्ये एकूण ६४१ इच्छुकांनी भाजपा तर्फे इच्छुक उमेदवार म्हणून इच्छा व्यक्त करत अर्ज उचलले आहेत,आता तसऱ्या व महत्त्वपूर्ण टप्प्यात सर्व इच्छुकांच्या प्रत्यक्ष मुलाखत



होणार असून तसा कार्यक्रम भाजपा तर्फे जाहीर करण्यात आलेला आहे ,भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री व स्थानिक स्वराज्य संस्था भाजपा राज्य निवडणूक प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे जिल्हा निवडणूक प्रभारी संजय कुटे, यांच्या सूचनेनुसार अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांच्या अध्यक्षतेमध्ये ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केल्या जाणार आहे,शनिवार दिनांक १३ डिसेंबर सकाळी १०.०० वाजता पासून स्थानिक लक्ष्मण स्मृती भाजपा कार्यालय राजापेठ अमरावती येथे मुलाखतीला सुरुवात होणार आहे. तीन दिवस या मुलाखती घेण्यात येणार आहे.

**वेळापत्रक खालील प्रमाणे**

१) शनिवार दिनांक १३ डिसेंबर २०२५प्रभाग क्रमांक १,२,३,५,६,७,८,९

२) रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५*प्रभाग क्रमांक- १०,११,१२,१३,१४,१७,१८,

३) सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५प्रभाग क्रमांक - १९,२०,२१,२२प्रत्येक प्रभागाला साधारण एक तासाचा वेळ दिलेला आहे, संख्येनुसार थोडा वेळ कमी जास्त होऊ शकतो,मुलाखत दरम्यान कोणत्याही इच्छुकांनी आपले कार्यकर्ते सोबत आणून कोणतेही शक्ती प्रदर्शन नारेबाजी असे प्रकार करू नये,याबाबत काही माहिती व विचारणा करायची असल्यास भाजपा अमरावती शहर जिल्हा महामंत्री बादल कुळकर्णी यांना संपर्क करावा तसेच इच्छुक उमेदवारांनी दिलेल्या सर्व सूचनांचे रीतसर पालन करावे असे आव्हान भाजपा अमरावती शहर तर्फे करण्यात आलेले आहे.

# जिल्ह्यात १.१७ लाख हेक्टरवर हरभरा, गव्हाची पेरणी

## रब्बीची ८०.४६ टक्के पेरणी आटोपली : निम्म्याहून अधिक हेक्टरवर हरभराची पेरणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

जिल्ह्यात हरभरा आणि गव्हाची १.१७ लाख हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे. एकूण उद्दिष्टांच्या ९५ टक्के क्षेत्र हे या दोन पिकांनी व्यापले आहे. यात हरभरा निम्म्याहून अधिक हेक्टरवर आहे. ६ हजार ५२४ हेक्टर अन्य पिकांचा समावेश आहे. आजवर रब्बीची ८०.४६ टक्के पेरणी आटोपली आहे.




जिल्ह्यात १ लाख ५४ हजार १० हेक्टर क्षेत्रावर रब्बीच्या पिकांचे नियोजन कृषी विभागाकडून करण्यात आले. यंदा अतिवृष्टी व हवामनातील बदलामुळे खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. त्यामुळेशेतकरी आधीच जेरीस आला असताना रब्बीच्या लागवडीचा वेग अत्यंत संथ दिसून आला. दिवाळीनंतर मात्र शासनाकडून नुकसान भरपाईची मदत, खरीपाचे उत्पन्न आल्यानंतर कोठे रब्बीच्या लागवडीला गती आली. खरीपातून झालेले नुकसान किमान रब्बीतून निघेल अशी आशा शेतकऱ्याला लागली आहे. त्यामुळे कमी खर्चात अधिक उत्पन्न देणाऱ्या नगदी पिक म्हणून हरभऱ्याकडे शेतकऱ्याचा अधिक कल दिसून येत आहे. त्या पाठोपाठ गव्हाची अधिक मागणी असल्याने गव्हाची देखील लागवड शेतकरी मोठ्या प्रमाणात करीत आहे. सद्यास्थिती १ लाख ५४ हजार हेक्टर प्रस्तावित क्षेत्रापैकी आतापर्यंत १ लाख २३ हजार ९१४ हेक्टरवर रब्बीची लागवड करण्यात आली आहे. याची टक्केवारी ८०.४५ टक्के एवढी आहे. यामध्ये एकट्या हरभराची ८१ हजार ७८५ हेक्टरवर लागवड करण्यात आली आहे.

त्या पाठोपाठ ३६ हजार हेक्टरवर गव्हाची लागवड करण्यात आली आहे. तिसऱ्या क्रमाकांवर कांदाची २,२४७ हेक्टरवर लागवड करण्यात आली आहे. त्यानंतर मका १,७२१ हेक्टर, ज्वारी २०५ हेक्टर, मोहरी २४ हेक्टर, जवस ६ हेक्टर, करडी ५.६ हेक्टर आणि भाजीपाल्याची ५५८ हेक्टरवर लागवड करण्यात आली आहे. यामहिन्या अखेरीसशंभर टक्के पेरणीची शक्यता वर्तविली जात आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून युवतीवर अत्याचार; पोलीस हवालदाराचा प्रताप

## आरोपी हवालदार मुख्यालयात कार्यरत; पिडीतीची फ्रेजरपुरा पो.स्टे. ला तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

लग्नाचे आमिष दाखवून पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या एका तरुणीवर अत्याचार करून धमकावल्याचा खळबळजनक प्रकार उघड झाला आहे. पीडितेच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी मुख्यालयात कार्यरत आरोपी गणेश रामसिग जांबेकर (२७, मांडवा, धारणी). याच्याविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे आणि तपास सुरू करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, पीडिता पोलीस भरतीची तयारी करत होती. २०२० मध्ये तिच्या प्रशिक्षणादरम्यान, पीडितेची भेट अमरावती ग्रामीण पोलिस मुख्यालयातकार्यरत असलेल्या आरोपी गणेश रामसिग जांबेकर सोबत झाली. त्यांची प्रथम मैत्री झाली आणि नंतर प्रेमात रूपांतर झाले. आरोपीने तिच्याशी लग्नकरण्याचे आश्वासन दिले. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी गणेशने खरेदीच्या बहाण्याने पीडितेला सोबत नेले. नंतर, तो तिला त्याच्या खोलीत घेऊन गेला आणि लवकरच लग्न करण्याचे आश्वासन देऊन तिच्यावर शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडला. पीडितेने नकार दिला,



मात्र आरोपीने तिच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला.

आत्महत्येचा प्रयत्न यानंतर, १ नोव्हेंबर २०२५ रोजी, आरोपीने पुन्हा शारीरिक संबंधांची मागणी केली. पीडितेने नकार दिल्यावर, आरोपीगणेशनेतिला मारहाणकेली. मानसिक तणावामुळे त्रस्त होऊन, पीडितेने खोलीत ठेवलेल्या पॅरासिटामोलच्या गोळ्या खाल्ल्या आणि आत्महत्येचा प्रयत्न केला, त्यानंतर आरोपी आणि त्याच्या मित्राने तिला इर्विन रुग्णालयात दाखल केले.

ठ्कोर्ट मॅरेजसाठी पोहचलाच नाहीठ्याघटनेनंतर, पीडितेने आरोपी गणेशसोबत ऑनलाइन कोर्ट मॅरेज नोंदणी केली आणि लग्नाची तारीख ४ डिसेंबर २०२५ निश्चित केली. मात्र आरोपी रजिस्ट्री ऑफिसमध्ये आला नाही आणि त्याचा फोन देखील बंदहोता. नंतर, तो पीडितेपासून दूर राहू लागला.

**तुला पाहिजे तितके पैसे घे, पण, दूर राहा**

८ डिसेंबर २०२५ रोजी आरोपीने फोन करून सांगितले की तो तिच्याशी लग्न करणार नाही. त्याने पीडितेला धमकी दिली की, तुला आवश्यक असलेले सर्व पैसे घे आणि माझ्या आयुष्यातून निघून जा, नाहीतर मी तुला जगू देणार नाही. अखेर पीडितेने गुरुवारी रात्री फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात आरोपी कॉन्स्टेबल गणेशच्या कृत्याबद्दल तक्रार दाखल केली.

# पोलिस असल्याची बतावणी करूनतीन वृद्धांच्या अंगठ्या लुटल्या; चौथा डाव मात्र फसला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

पोलिस अधिकारी असल्याचे भासवून वृद्धांची सवणूक करण्याच्या खळबळजनक घटना क्रवारी सकाळी जिल्ह्यातील बेनोडा आणि वोर्शी पोलिस स्टेशन परिसरात उघडकीस आल्या. तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये मोटारसायकलवरून आलेल्या संशयितांनी ७० वर्षावरील वृद्धांच्या हातातील सोन्याच्या अंगठ्या हिसकावून पळ काढला. मात्र वरुडमध्ये चौथी घटना घडवण्यात आरोपी अपयशी ठरले. चारही घटनांमध्ये दोन मोटारसायकलवरून आलेल्या चार आरोपींचा सहभाग असल्याचे वृत्त आहे. आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. यानंतर, ग्रामीण पोलिस आणि एलसीबी फरार आरोपींचा सक्रियपणे शोध घेत आहेत.

थ्पहिली घटना थ्बेनोडा बस स्टँड सकाळी ९:४५ ते १०:०० च्यादरम्यान, दोनतरुण मोटारसायकलवरून बेनोडा गाव बस स्टँडवर आले. पोलिस असल्याचे भासवून त्यांनी दशरथ जंगलुजी खुरसांगे (७८, बेनोडा) व्यांच्याकडून ६ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी चोरली. घरी परतल्यावर त्यांना एका कागदाच्या



पॅकेटमध्ये दगड सापडले. तेव्हाच त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

दुसरी घटना - गाडेगाव-हतुर्णा रोड दुपारी १२:४५ वाजता, त्याच टोळीने साहेबराव महादेवराव गावंडे (७७, अलोदा) व्यांना थांबवले आणि त्यांची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी चोरली. पोलिस असल्याचे भासवून आरोपींनी त्यांना दंगलीची माहिती दिली आणि रुमालात गुंडाळलेले दगड दिले.

तिसरी घटना - मोर्शी परिसर सकाळी १०:३० ते १०:४८ च्या दरम्यान,दोन मोटारसायकलवरून आलेल्या चार आरोपींनी शालिक रामजी बाबाजी खैरकर (७६, येरळा) यांना सालबर्डी-पाला रोडवर थांबवले आणि पोलिस असल्याचे सांगून त्यांच्या ७ ग्रॅम आणि ८ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या चोरल्या.

# बडनेरातील गोदामात ठेवलेला शेतीमाल विकून ३.५४ कोटी रुपयांची फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

बडनेरा येथील नेमाणी गोदामात सोयाबीन, हरभरा, मका, डाळ आणि डाळ आदी शेतमाल तारण ठेवत कोट्यवधी रुपयांचे कर्ज घेतले. मात्र हा तारण ठेवलेला माल परस्पर विना परवानगी विकून बँकेची ३ कोटी ५४ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या पत्राच्या आधारे, बडनेरा पोलिसांनी गुरुवारी रात्री दोन आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. गौरव विजयकुमार मुंदडा (३७, शंकर नगर) आणि सुमित कांतिलाल भन्साली (३७, भाजी बाजार) अशी नावे आरोपी आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी गौरवमुंदडा याने नेमाणी गोदाम क्रमांक १, ८ आणि ११ भाड्याने घेतले आणि तेथे शेतीमाल साठवला. खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडकडे त्याच मालाच्या पावत्या गहाणठेवून, ४ एप्रिल



२०२४ रोजी ६५ लाख रुपये, ३१ मे २०२४ रोजी ३५ लाख रुपये आणि १० डिसेंबर २०२४ रोजी ४० लाख रुपये कर्ज घेतले, एकूण १ कोटी ४० लाख रुपये. त्याचप्रमाणे आरोपी सुमित कांतिलाल भन्साळी यांनी गौरव मुंदडा यांच्या गोदामांमध्ये सोयाबीन आणि ढेप जमा केले आणि पावत्या बँकेकडे गहाण ठेवल्या. त्यानंतर ४ मार्च २०२४ रोजी १ कोटी ३८ लाख ५६ हजार रुपये, २१ डिसेंबर २०२४ रोजी ५८ लाख रुपये आणि रु. २९ मार्च २०२५ रोजी ६१ लाख ९० हजार रुपये कर्ज घेतले. गौरव मुंदडा यांनी बँकेची पूर्वपरवानगी न घेता त्यांच्या आणि सुमित भन्साळींचा तारण ठेवलेल्या सर्व माल विना परवानगी विकल्याचा आरोप आहे. गौरव मुंदडा आणि सुमित भन्साळी यांनी बँकेची ३ कोटी ५४ लाख ९० हजार रुपयांनी आर्थिकफसवणूक केली. या प्रकरणी बँकेच्या वतीने दीपक बाबाराव बांबल यांनी आर्थिक गुन्हे शाखा पोलिसांकडे तक्रार दाखल केली. आर्थिक गुन्हे शाखेच्या पत्राच्या आधारे या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर, पोलिसांनी आरोपी गौरव विजयकुमार मुंदडा आणि सुमित कांतिलाल भन्साली यांच्याविरुद्ध आयपीसीच्या विविध कलमांखाली फसवणुकीचा गुन्हादाखल केला आहे आणि तपास सुरू केला आहे.

# वीज तपासणीच्या नावाखाली घरात घुसखोरी, व्हिडिओमुळे खळबळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३चांदुर रेल्वे**

येथील प्रतिष्ठीत नागरिक आणि काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते गोविंदराव देशमुख यांच्या निवासस्थानी महावितरण कंपनीच्या तपासणी पथकाने केलेल्या अचानक धाडीने मोठा वाद उद्भवला आहे. दहा ते बारा कर्मचाऱ्यांच्या पथकाने कोणतीही पूर्वसूचना किंवा परवानगी न घेता घरात प्रवेश केला. त्यावेळी घरात फक्त एक महिला उपस्थित होती आणि तिची प्रकृती अत्यंत खराब होती. तरीदेखील तपासणी पथकाने थेट बेडरूममध्ये जाऊन तपासणी केली असल्याची माहिती मिळते. ही कृती घरातील व्यक्तींच्या गोपनीयतेचा भंग, तसेच महिलांचा सन्मान धोक्यात आणणारी असल्याच्या तीव्र प्रतिक्रिया नागरिकांमध्ये उमटत आहेत.

याशिवाय तपासणीदरम्यान कर्मचाऱ्यांनी घरातील, परिसराचे व खोल्यांचे व्हिडिओ शुटिंग केल्याचा गंभीर आरोप संबंधित परिवाराने केला असून, हे पूर्णतः नियमबाह्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तपासणी केल्यानंतर महावितरणला वीज चोरीचा कोणताही प्रकार आढळून आला नाही, हे अधिकृतरित्या स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ही संपूर्ण कारवाई मनमानी व महिलांच्या सुरक्षिततेच्या नियमांचे उल्लंघन करणारी असल्याचे परिवाराने म्हटले आहे. याप्रकरणातील सर्व बाबी लक्षात घेऊन देशमुख परिवाराने महावितरणकडे तसेचमहाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे लेखी तक्रार दाखल केली. तपासणी पथकाने केलेल्या अनियमिततेची चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, महिलांच्या सुरक्षेचे नियम पायदळी तुडवले जात असल्याबद्दलही आवाज उठू लागला आहे. या प्रकरणाचा तपास होणार असून, महावितरण प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


सध्या वीज चोरी शोध मोहीम सुरू आहे. त्यानुसार वीज बिल व प्रत्यक्ष वीज वापर याबाबत संशय असणाऱ्या ग्राहकांच्या वीज मिटरची तपासणी सुरू आहे. ही मोहीम संपूर्ण तालुक्यात सुरू आहे. त्यामुळे नियमानुसार वीज कर्मचारी तपासणी करीत आहेत. त्यानुसार देशमुख यांच्या घरी वीज मिटरची तपासणी करण्यासाठी गेले होते. त्यांच्या घरात व महिलेच्या बेडरूममध्ये वीज कर्मचारी गेले नाहीत.

**स्थुल, उपकार्यकारी अभियंता (ग्रामीण), चांदूररेल्वे.**

मी काँग्रेस पक्षाचा ज्येष्ठ नेता असून खरेदी-विक्री संघाचा अध्यक्ष आहे. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील प्रतिमा खराब करण्यासाठी आणि माझ्या राजकीय प्रभावाला धक्का पोहोचवण्यासाठी नियोजनपूर्वक हा प्रकार घडवून आणण्यात आला. माझ्यावर चुकीचे आरोप लावण्याचा प्रयत्न झाला.

**- गोविंदराव देशमुख, अध्यक्ष, खरेदी-विक्री समिती, चांदूरेल्वे.**

# मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून २७ शिक्षकांचा सन्मान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती जिल्हा परीषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमांतर्गत शिक्षक, शाळा व केंद्रप्रमुखांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हातील २७शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

हा कार्यक्रम जिल्हा परिषद अमरावती व ओपन लिंक्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय शिक्षणात गुणवत्ता, नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढविण्याच्या उद्देशाने राबविला जात आहे. कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे शिक्षकांनी आपल्या शाळेत राबविलेल्या नवोपक्रमांचे विनोबा पवर शेअरिंग,तसेच महिन्याला उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा तालुका व जिल्हा स्तरावर सन्मान.याच कार्यक्रमात मिशन १०० अंतर्गत ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती सराव चाचणी २ मधील जिल्ह्यातील टॉप ६ शाळांना देखील गौरविण्यात आले. तसेच विनोबा पवरील लीडरबोर्डमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षक, शाळा, केंद्रे व केंद्रप्रमुखांनाही विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी महापात्र यांनी शिक्षकांना तंत्रज्ञानाचा प्रभावी आणि समृद्ध शिक्षणासाठी आवश्यक वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी आपल्या शाळाभेटीतील अनुभव शेअर करत शिक्षकांना विद्यार्थ्यांना अधिक सक्षम करण्यासाठीसातत्याने कार्य करण्याचा संदेश दिला. कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (प्रा.) सतीश मुगल, उपशिक्षणाधिकारी (परीक्षाविधी) प्रेरक उजगारे, श्वेता गोळे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण खांडेकर, जिल्हा प्रकल्प अधिकारी सागर गजभिये, उत्कर्ष मेश्राम तसेच २७ शिक्षक आणि केंद्रप्रमुख उपस्थित होते.

# कोट्यवधींचा खर्च करूनही मेळघाटात कुपोषणाची परिस्थिती अद्यापही जैसे थे

## आरोग्य, महिला व बालविकास, आदिवासी विभागाने एकत्रित कामाची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ नागपूर**

राज्यातील कुपोषणग्रस्त जिल्ह्यांमध्ये बालमृत्यू , मातामृत्यू रोखण्यासाठी व हे जिल्हे कुपोषण मुक्त करण्यासाठी शासनाच्या वतीने कोट्यावधींचा निधी खर्च करूनही कुपोषणाची समस्या जैसे थे आहे. जिल्ह्यातील मेळघाटात तर कुपोषणाचा वाढता आलेख चिंतेची बाब असून तेथे कार्यरत यंत्रणा कुचकामी ठरताना दिसत आहे. शासनानेही याबाबत चिंता व्यक्त केली असली तरी मेळघाटात जो काही अनागोंदी कारभार सुरु आहे, याला आळा बसण्यासाठी शासनाने लक्ष घालण्याची नितांत गरज असून आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग तसेच आदिवासी विभागाने संयुक्त बैठक घेऊन उपाययोजना राबविण्याची सुचना वजामागणी आमदार संजय खोडके यांनी केली आहे.




नागपूर हिवाळी अधिवेशनात विधान परिषदेच्या कामकाजामध्ये कुपोषण निर्मूलनाच्या संदर्भातील चर्चेमध्ये आ. संजय खोडके यांनी सहभागी होऊन मेळघाटमधील कुपोषण तसेच बालमृत्यू व मातामृत्यू संदर्भातील विदारक परिस्थिती संदर्भात शासनाचे लक्ष वेधले.

आ. संजय खोडके म्हणाले कि, राज्यात वर्ष २०२० पासून बालमृत्यू ८४ हजार ३०४ एवढे झाले. गर्भामध्ये मृत्यू ७० हजार ४५४ तसेच माता मृत्यू ६,५७४ झाले आहेत. तसेच मेळघाटात यावर्षी एप्रिल ते ऑक्टोबर महिन्याच्या कालावधीमध्ये ९७ बालमृत्यू, गर्भातील मृत्यू ३० तसेच मातामृत्यू ३ झाले आहेत. यामागचे कारण त्यांना पोषण आहार व आरोग्याच्या योग्य सुविधा मिळत नसल्याने हे प्रमाण वाढत जात असल्याचे सांगून आ. संजय खोडके यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. मेळघाटात काही 'एनजीओ' काम करतात, किंवा पोषण आहार पुरवठ्याच्या बाबतीत ज्या काही एजन्सीज काम करतात. त्यांच्या कामात देखील प्रचंड अनागोंदी सुरु असल्याचे चित्र असून हि व्यवस्था कधी बदलविणार ? असा प्रश्न सुद्धा त्यांनी उपस्थित केला.

मेळघाटातील कुपोषणमुक्तीसाठी प्रभावी उपाययोजना करण्यासाठी आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग तसेच आदिवासी विकास विभाग यांनी खऱ्या अर्थाने एकत्रितपणे प्रभावी काम करण्याची गरज आहे. यासाठी शासनाने सर्व यंत्रणांची संयुक्त बैठक लावून कुपोषण मुक्ती संदर्भात ठोस पाऊले उचलण्याची नितांत गरज असल्याचे आ. संजय खोडके यांनी अधिवेशनात म्हटले आहे.

आयपीएस दोरजे समितीच्या अहवालाचा अंमल गरजेचा मेळघाटात कुपोषण निर्मुलनासाठी शासनाने आतापर्यंत अनेक समित्या नेमल्या. यातच आयपीएस दोरजे यांची एक समिती होती, त्या समितीने अभ्यास करून एक हजार पानांचा अहवाल दिला होता. त्या अहवालाची अंमलबजावणी जर आज खऱ्या अर्थाने झाली असती तर आपण बऱ्यापैकी कुपोषणावर मात करू शकलो असतो. मेळघाटातील आरोग्याच्या समस्येचे एक कारण अंधश्रद्धा हे सुद्धा आहे. तेथील अनेक लोक आजही रुग्णालयांकडे न जातात त्या भागातील एखाद्या जाणकाराकडून किंवा त्याच्या सल्ल्याने उपचार घेतात. त्यामुळे अश्या प्रकारांना आळा बसणेही आवश्यक असून याबाबत प्रभावी जनजागृती करून अंधश्रद्धा निर्मूलन करण्याची सुचना सुद्धा आ. संजय खोडके यांनी केली.

# कापसावर बोंड अळीचा प्रादुर्भाव; उत्पादन ५० टक्के घटण्याची भीती



## लागवडीवर झालेला खर्च निघण्याची शक्यता कमीच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ दर्यापूर**

दिवाळीपर्यंत सुरू राहिलेल्या अवकाळी पावसाने सोयाबीनचे पीक अक्षरशः वाहून नेले, आणि ज्या कापसावर शेतकऱ्यांनी शेवटची आशा ठेवली होती. त्यावरही आता बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. वर्षभर कर्ज काढून, लाखो रुपये खर्च करून, फवारण्या, सिंचन, खतांचा भार उचलत शेतकऱ्यांनी पीक वाढवले. शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे, कापसावर केलेला खर्च निघेल की, नाही याचीही शाश्वती राहिलेली नाही. सततचे नैसर्गिक संकट, रोगराई आणि वाढते उत्पादनखर्च यांच्या ताणतणावांमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडला आहे. शिवाय कापसाच्या उत्पादनात देखील पन्नास टक्के घट होण्याची भिती देखील व्यक्त करण्यात येत आहे.


गेल्या काही दिवसांतील अवकाळी पावसामुळे कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आता कापसाच्या बोंडांमध्ये गुलाबी अळीचा प्रादुर्भाव वाढत आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून चांगल्या उत्पादनासाठी शेतकरी रात्रंदिवस कष्ट करत आहेत. वेळी-वेळी फवारणी, सिंचन, खत खतांची मात्रा देणे अशा सर्व प्रक्रिया नियमितपणे केल्यामुळे कपासाची पीके चांगली वाढलेली दिसत होती. मात्र काही शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात कपासाच्या बोंडांवर गुलाबी अळीचा प्रादुर्भाव दिसत असल्याने शेतकरी हतबलझाले आहेत.

# ४८ लाख शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत; कृषी योजनांचे पैसे त्वरित वाटप करण्याची हिवाळी अधिवेशनात मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नागपूर**

राज्यातील तब्बल ४८ लाख शेतकरी विविध कृषी योजनांच्या अनुदानाच्या प्रतीक्षेत असून, गेल्या चार वर्षांपासून त्यांच्या अर्जांवर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात लक्ष वेधत, शेतकऱ्यांना तातडीने कृषी योजनांचे अनुदान वितरित करण्याची जोरदार मागणी केली.आ. सुलभाताई खोडके यांनी सांगितले की, कृषी यंत्रे व अवजारे, सूक्ष्म सिंचन






योजना, मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना, फलोत्पादन योजना, वैयक्तिक शेततळे योजना आदी विविध योजनांतर्गत शेतकऱ्यांनी अनुदानासाठी अर्ज केले आहेत. मात्र, हे सुमारे ४८ लाख अर्ज गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

केंद्र व राज्य शासनाकडून अनुदानासाठी किती निधी उपलब्ध होईल, याचा अंदाज न घेता कृषी विभागाने अर्ज मागविल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोपही त्यांनी केला. शासनाकडे निधी नसतानाही अर्ज स्वीकारले गेले, मात्र अद्याप अनुदान न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे यामागची कारणे काय, तसेच अनुदान वाटपासाठी शासनाने नेमकी कोणती कार्यवाही केली आहे, याचा खुलासा करावा, असा सवाल त्यांनी कृषी मंत्र्यांना केला.

यावर लिखित उत्तर देताना राज्याचे कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, विविध योजनांतर्गत 'प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर ४६ लाख ५८ हजार ३२० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. मात्र, सर्व बाबी संपृक्तता मोडवर राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे.

त्यासाठी कृषी समृद्धी योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी विविध योजनांकरिता अर्थसंकल्पित तरतूद, प्रशासकीय मान्यता व निधी वितरणाची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेसाठी हिवाळी अधिवेशनात १२७.७१ कोटी रुपयांची पूरक मागणी सादर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. केंद्र पुरस्कृत योजनांसाठी दुसऱ्या हप्त्याच्या निधीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे.याशिवाय कृषी समृद्धी योजनेसाठी सन २०२५-२६ पासून पुढील पाच वर्षांसाठी दरवर्षी ५,००० कोटी रुपये, म्हणजेच एकूण २५,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यास २९ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आल्याचेही कृषी मंत्र्यांनी आपल्या उत्तरात नमूद केले.

# एसटीकडून राज्यभर पार्सल सेवा;अमरावती आगारातूनही स्वस्त दरात सुविधा उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवासी वाहतुकीसोबतच राज्यभर पार्सल सेवेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सेवेकरिता महामंडळाने खासगी कंपनीची नियुक्ती केली असून, तिच्या माध्यमातून जिल्ह्यांच्या मुख्य बसस्थानकांवरून विविध ठिकाणी पार्सल वाहतूक केली जात आहे. लवकरच घरपोच पार्सल सेवेची सुविधाही सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.अमरावती आगारातही पार्सल स्वीकारणे तसेच वितरणाची सुविधा सुरू करण्यात आली आहे. यासाठी खासगी कंपनी कार्यरत असून, एसटी महामंडळाने निश्चित केलेल्या नियमांनुसार पार्सलचे दर आकारले जात आहेत.

पार्सलचे दर व विमा :पार्सल सेवेचे दर अंतर व वजनानुसार निश्चित करण्यात आले आहेत. १ ते २० किलो वजनाच्या पार्सलसाठी अंतरानुसार दर आकारले जात असून, कमाल दर १ हजार रुपयांपर्यंत आहे. पार्सलसाठी विमा सुविधा उपलब्ध असून, त्यासाठी स्वतंत्र शुल्क भरावे लागते. नुकसान झाल्यास विम्यानुसार भरपाई दिली जाते.

खासगी कुरिअरपेक्षा स्वस्त सेवा अमरावती शहरात खासगी कुरिअर सेवा देणाऱ्या अनेक कंपन्या कार्यरत आहेत. मात्र, त्यांच्यापेक्षा कमी दरात एसटी महामंडळाकडून पार्सल सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याने नागरिकांना कमी खर्चात वस्तू पाठवण्याचा पर्याय मिळाला आहे.

दररोज ५० पार्सलची वाहतूक :चंद्रपूर विभागातील सर्व आगारांतून दररोज पार्सल पाठवले जात असून, सरासरी ५० पार्सलची वाहतूक होते. चंद्रपूर आगारातून सर्वाधिक पार्सल पाठवले जात असल्याची माहिती आहे.

एसटी महामंडळाची पार्सल सेवा सुरळीत सुरू असून, प्रवाशांसह व्यापारी व नागरिकांनाही या सेवेचा मोठा फायदा होत आहे. भविष्यात पार्सल सेवेचा विस्तार करून अधिक सुविधा देण्याचा महामंडळाचा मानस आहे.

# प्रचाराचा कालावधी वाढला खर्चमर्यादा मात्र तशीच

## उमेदवारांची आयोगाकडे मर्यादा वाढविण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अंजनगाव सुर्जी**




राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयीन प्रकरणातील उमेदवारांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यानंतर नगरपरिषद व नगरपंचायतींमधील प्रचाराचा कालावधी वाढला आहे. मात्र, निवडणूक खर्चाची मर्यादा पूर्वीप्रमाणेच असल्याने उमेदवार आर्थिक अडचणीत सापडले असून खर्चमर्यादा वाढविण्याची मागणी आयोगाकडे केली जात आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार अंजनगाव सुर्जी नगरपरिषद व इतर पालिकांमध्ये २० डिसेंबर रोजी मतदान होत असून, गुरुवारी निवडणूक चिन्ह वाटपानंतर प्रचाराला पुन्हा वेग आला आहे. अंजनगाव सुर्जी येथे नगराध्यक्षपदासाठी सात तर सदस्यपदासाठी १७३ उमेदवार रिंगणात आहेत. याशिवाय उरुडला दोन, धारणीमध्ये सहा, दर्यापुरात सहा आणि अचलपूर नगरपरिषदेत १५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

पूर्वीच्या कार्यक्रमानुसार २६ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत उमेदवारांनी निवडणूक खर्च केला होता. आता पुन्हा ११ ते १९ डिसेंबर या दहा दिवसांच्या प्रचारामुळे एकूण १४ ते १५ दिवसांचा प्रचार कालावधी मिळत आहे. मात्र, खर्चमर्यादा तीच राहिल्याने उमेदवारांना प्रचारात हात आखडता घ्यावा लागत आहे.दरम्यान, पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारांचे लक्ष आता २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे. निवडणूक यंत्रणाही मतमोजणीच्या नियोजनात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे.

**अशी आहे निवडणूक खर्चमर्यादा :**

'अ' वर्ग नगरपरिषद अचलपूरमध्ये सदस्यांसाठी ५ लाख रुपये,नगरपंचायत धारणीमध्ये सदस्यांसाठी २.२५ लाख रुपये,'ब' वर्ग नगरपरिषद अंजनगाव सुर्जी येथे नगराध्यक्षपदासाठी ११.२५ लाख व सदस्यांसाठी ३.५० लाख रुपये,तसेच वरुड व दर्यापूर नगरपरिषदांमध्ये सदस्यांसाठी ३.५० लाख रुपयांची खर्चमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.मतदानानंतर तब्बल १९ दिवसांनी, २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याने उमेदवार व कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. निकालाच्या प्रतीक्षेत अनेकांची झोप उडाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

# कऱ्हाडगव्हाण-पालवाडी-मिरचापूर परिसरात बिबट्याचा मुक्त संचार; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ तिवसा**

कऱ्हाडगव्हाण, पालवाडी आणि मिरचापूर या गावांच्या केंद्रस्थानी असलेल्या शेतशिवारात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार सुरू असल्याने परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगळवारी कऱ्हाडगव्हाण-पालवाडी-मिरचापूरच्या मध्यभागी असलेल्या शेतात जात असताना शेतकरी त्रिशूल सोमवंशी यांना भर दिवसा बिबट दिसून आला. हा बिबट मिरचापूरच्या दिशेने शेतशिवारात जात असल्याचे त्यांनी पाहिले.

याच्या दोन दिवस आधी सकाळच्या सुमारास कऱ्हाडगव्हाण व पालवाडीच्या दरम्यान कऱ्हाडगव्हाण येथील एका शेतकऱ्याला बिबट दिसला होता. त्याच दिवशी सायंकाळी कऱ्हाडगव्हाण येथील अजय चौधरी यांच्या शेताकडून रस्ता ओलांडून ठाकरे यांच्या शेताकडे, म्हणजेच पालवाडीच्या दिशेने जात असताना बिबट डॉ. धुमनखेडे यांच्या निदर्शनास आला.

तसेच या घटनेच्या दोन दिवस आधी कऱ्हाडगव्हाण येथील शेतकरी राम वानखडे यांच्या ओलीत केलेल्या शेतात बिबट्याचे ठसे आढळून आले होते. या सातत्याने दिसणाऱ्या घटनांमुळे बिबट्याचा परिसरात वावर असल्याचे स्पष्ट झाले आहे.या सर्व घटनांमुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण असून वनविभागाने तातडीने लक्ष घालून योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# तीन वर्षांत फार्मसी महाविद्यालयांचे पेव

## यंदा बी. फ़ार्मच्या १५ हजार ९३६ जागा रिक्त; संख्या वाढतेय, पण टक्का घसरतोय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

गेल्या तीन वर्षांत फार्मसी महाविद्यालयांचे पेव फुटले आहे. जागा झपाट्याने वाढल्या. परंतु विद्यार्थ्यांचा ओढा मात्र सतत कमी होत चालल्याने अनेक महाविद्यालयांत रिक्त जागा आहेत. राज्यभरात तब्बल ७१ महाविद्यालयांत २० हून कमी, तर ३७ महाविद्यालयांत १० हून कमी प्रवेश झाले असून, परिस्थिती गंभीर बनली आहे. बी. फ़ार्म आणि एम. फ़ार्म प्रवेश प्रक्रिया पाच महिने चालली. अखेर १७ नोव्हेंबर रोजी प्रवेश प्रक्रिया संपली. राज्यात बी. फ़ार्म मध्ये १५ हजार ९३६ आणि एम. फ़ार्म. मध्ये ८१५ जागा रिक्त राहिल्या आहेत. यंदा बी. फ़ार्म. च्या ५३१ महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या ४६ हजार ३५० केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेच्या जागा आणि २ हजार ५२८ व्यवस्थापन कोट्याच्या जागांपैकी १५ हजार ९३६ जागा रिक्त राहिल्या. एम. फ़ार्म. मध्ये राज्यातील २२९ संस्थांमधील ८ हजार ६२४ जागांपैकी आणि ७३२ व्यवस्थापन कोटा असलेल्या अभ्यासक्रमांतही ८१५ जागा रिक्त राहिल्या. रेंगाळलेली प्रवेश प्रक्रिया, वाढणाऱ्या संस्था आणि गुणवत्तेवर दिवसेंदिवस निर्माण होत असलेले प्रश्नचिन्ह यामुळे रिक्त जागांचा आलेख दरवर्षी उंचावत आहे. फार्मसी अभ्यासक्रमाकडे ओढा कमी झाल्याने अनेक महाविद्यालयांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या वर्षी २०२४ - २०२५ या शैक्षणिक वर्षात बी. फ़ार्म. च्या १०२ महाविद्यालयांत ८ हजार ३२० पैकी ४ हजार ८४९ प्रवेश निश्चित झाले होते. यावर्षी १०६ महाविद्यालयांच्या ८ हजार ६२० जागा असून, ५०२० जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. २०२४ - २०२५ मध्ये डी. फ़ार्म. च्या १४१ महाविद्यालयांतील ८ हजार ५२० जागांपैकी ६ हजार ८४ प्रवेश निश्चित झाले होते. २०२५ - २०२६ या शैक्षणिक वर्षात १५३ महाविद्यालयांच्या ९ हजार २४० जागांपैकी ७ हजार ८५ प्रवेश निश्चित झाले. सीईटी देणाऱ्यांची संख्या दरवर्षी साधारण ५० ते ६० हजारांनी वाढत असताना फार्मसीकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत फारशी वाढ नाही. २०२३ - २०२४ मध्ये ५ लाख ९१ हजार १३५ विद्यार्थ्यांनी सीईटी दिली. फार्मसीच्या ४२ हजार ७९४ पैकी २८ हजार ३८७ जागांवर प्रवेश झाले, तर २०२४ - २०२५ मध्ये ६ लाख ७५ हजार ४४५ विद्यार्थ्यांनी सीईटी दिली. ४८ हजार ५१ जागांपैकी ३१ हजार ८२७ जागांवर प्रवेश झाले होते. मात्र, फार्मसीला प्रवेश घेणाऱ्यांची संख्या दरवर्षी उपलब्ध जागेच्या तुलनेत घटत आहे. मात्र, या क्षेत्राकडे मुलींचा ओढा वाढत असल्याचे आकडेवारीवरून दिसते.

# अमरावतीत ११ जानेवारीला तृतीय भव्य विदर्भस्तरीय सायकल स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती सायकलिंग असोसिएशन, दिशा संस्था तसेच हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती शहरात तृतीय भव्य विदर्भस्तरीय सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार दि. ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६:३० ते १०:३० या वेळेत सलुजा सेलिब्रेशन लॉन, बुना बायपास, एम.आय.डी.सी. रोड, अमरावती येथे होणार आहे.

या स्पर्धेमध्ये विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने स्पर्धक सहभागी होत असून शाळकरी मुलांपासून ते प्रौढांपर्यंत विविध वयोगटांसाठी ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धकांना शनिवार दि. १० जानेवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत स्पर्धास्थळी सायकल जमा करणे, टी-शर्ट, किट व बीब वाटप करण्यात येणार आहे. ज्या स्पर्धकांकडे हेल्मेट उपलब्ध नाहीत त्यांना अत्यल्प दरात अमानत रक्कमेवर हेल्मेट देण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी रस्त्यावर किलोमीटर मार्किंग करण्यात आले असून पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने मार्गावर बॅरिकेट्स लावण्यात येणार आहेत. नॅशनल हायवे अथॉरिटीकडून कोंडेश्वर चौक ते गौरी इनपर्यंत डाव्या बाजूचा संपूर्ण रस्ता स्पर्धा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, झेनिथ हॉस्पिटल व रिम्स हॉस्पिटल यांच्या सहकार्याने ॲम्बुलन्स व वैद्यकीय पथक उपलब्ध करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील घरांसाठी ५ हजार अतिक्रमण नियमानुकूल

## शहरीसह ग्रामीण भागातील नागरिकांना लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



सर्वांसाठी घरे उपलब्ध होण्यासाठी शासन स्तरावरून विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. यामध्ये नागरी भागातील प्रामुख्याने २०११ पूर्वी अतिक्रमण असल्यास ते नियमानुकूल करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ५ हजाराहून अधिक अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात आली आहे. याचा लाभ शहरीसह ग्रामीण भागातील नागरिकांना झाला आहे.

सर्वांसाठी घरे या योजनेच्या माध्यमातून आजअखेर अमरावती महापालिकेमध्ये एकूण २ हजार ८१२ अतिक्रमण नियमानुकूल करून हक्काचे घर देण्याबाबत कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील नगरपालिकांमध्ये ९२० लाभार्थ्यांना या माध्यमातून जमिनीची मालकी उपलब्ध करून घरकुल मंजूर केले आहे. ग्रामीण भागातील बाराशे लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सर्वांसाठी घरे हा अतिशय स्तुत्य उपक्रम केंद्र शासनाने हाती घेतला आहे. या उपक्रमातून समाजातील सर्व घटकांना घरे उपलब्ध करून देण्यात येत आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने देखील हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून घरासाठी अनुदान मंजूर होण्यास पात्र असणारे, मात्र ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, अशा व्यक्तींसाठी महापालिका, नगरपालिका आणि ग्रामीण क्षेत्रातील दि. १ जानेवारी २०११ पूर्वीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे.

या कार्यक्रमांतर्गत पंतप्रधान आवास योजना, रमाई योजना, घरकुल योजनेंतर्गत घर मिळण्यास पात्र आहे. मात्र त्यांच्याकडे स्वतःची जागा नसल्याने त्यांना शासनाच्या घरांसाठी योजनेचा लाभ घेता येत नाही, अशा व्यक्तींचे शासकीय जमिनीवर दि. १ जानेवारी २०११ पूर्वी अतिक्रमण अस्तित्वात असल्याचे पुरावे दिल्यास सदरचे अतिक्रमण नियमानकुल करण्याची भूमिका घेतली आहे. यामुळे समाजातील तळागाळातील गरजू व्यक्तींना स्वतःची हक्काची जागा व त्यावर शासनामार्फत विविध योजनेच्या माध्यमातून घर मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. जिल्ह्यामध्ये पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सदरची योजना युद्ध पातळीवर पूर्ण करणे बाबत निर्देश दिले. सदर योजनेमध्ये उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिल्याने अडचण निर्माण झाली. याबाबत पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी महसूल मंत्री म्हणून शासन स्तरावर पाठपुरावा केला. सदरचा स्थगिती आदेश रद्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे उच्च न्यायालयामध्ये अभ्यासपूर्ण पद्धतीने सादर केली. परिणामी उच्च न्यायालयाने सदर स्थगिती आदेश उठवला आहे. त्यामुळे ही योजना राबवण्यामधील मोठी अडचण दूर झाली आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी देखील ही योजना प्राधान्याने राबवण्यावर भर दिला आहे. मागील आठवड्यात महापालिकेच्या समितीने सादर केलेल्या ३०५ पात्र लाभार्थ्यांच्या यादीला जिल्हाधिकारी यांनी एका दिवसातच मंजुरी दिली आहे. ज्यामुळे महापालिकेतील समितीने पात्र केलेले सर्व प्रकरणे जिल्हास्तरावरील समितीने मान्यता देऊन त्यांना पट्टेवाटप करण्याचा मार्ग खुला केला आहे. आजमितीस जिल्हाधिकारी कार्यालयाकडे याबाबत एकही प्रकरण प्रलंबित नाही. सदर योजना ही अत्यंत लाभदायी असल्याने या योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका व जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# मोर्शी विधानसभा मतदार संघातील २९० कोटी रुपयांची रद्द केलेली कामे मंजूर करा

## देवेंद्र भुयार यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना साकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३वरूड १**



मोर्शी वरूड तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी तत्कालीन आमदार देवेंद्र भुयार यांनी त्यांच्या ५ वर्षाच्या कार्यकाळामध्ये जनतेसाठी सेवेसाठी आरोग्य यंत्रणा प्राधान्याने निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतल्यामुळे मोर्शी वरूड तालुक्यातील जनतेसाठी अजितदादा पवार उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री यांच्याकडे विशेष पाठपुरावा करून मोर्शी विधानसभेमध्ये कोट्यावधी रुपयांचा विकासनिधी खेचून आणून मोठ्या प्रमाणात विकासकामे मंजूर करून घेतली.

मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये मोर्शी विधानसभा मतदार संघातील जनतेने भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारावर कृपा करून भरघोस मतांनी निवडून दिले तरीही सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी आमदार देवेंद्र भुयार यांनी विशेष प्रयत्न करून मंजूर करून आणलेले वरुड येथील अतिरिक्त १०० बेड रुग्णालय ५० कोटी रुपये, राजुरा बाजार येथील ३० बेड रुग्णालय ५० कोटी रुपये, मोर्शी येथील ट्रामा केयर हॉस्पिटल १५ कोटी रुपये, बेनोडा ट्रामा केयर हॉस्पिटल १५ कोटी रुपये, मोर्शी शहरातील प्रमुख रस्ते निधी ८५ कोटी रुपये, शे घाट शहरातील प्रमुख रस्ते निधी ५० कोटी रुपये, वरुड, मोर्शी, शेघाट येथील निधी १५ कोटी रुपये, अल्पसंख्याक निधी १० कोटी रुपये अशी सर्व २९० कोटी रुपयांची जनहिताची कामे आमदार उमेश यावलकर यांनी रद्द केल्याचा आरोप माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी केला.

मोर्शी विधानसभा मतदार संघातील सर्वसामान्य जनतेच्या सोईसाठी मंजूर करून आणलेले उपजिल्हा रुग्णालय मोर्शी, वरूड येथे नवीन ट्रॉमा केअर युनिट, वरुड, मोर्शी, तालुक्यातील नवीन प्राथमिक तसेच उप आरोग्य केंद्रे, उप जिल्हा रुग्णालयांना मंजुरी देण्याबरोबरच, रुग्णालयांचे श्रेणीवर्धन, पदभरतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करणे गरजेचे असताना २९ मे रोजी शासन निर्णय काढून आरोग्य विभागाची मंजूर कामे रद्द केल्यामुळे मोर्शी विधानसभा मतदार संघातील नागरिकांवर अन्याय होणार असल्याची बाब माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आणून दिली असून मोर्शी विधानसभ मतदार संघात रुग्णालयांना वैद्यकीय चाचणी आणि अद्ययावत उपचार यंत्रणा उपलब्ध करून देण्यासाठी मोर्शी मतदार संघातील रद्द करण्यात आलेली २९० कोटी रुपयांची कामे पूर्ववत मंजूर करून अधिवेशनामध्ये तशी घोषणा करून मोर्शी वरुड तालुक्यातील नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत